# राज्यात ८१ हजार कोटींची गुंतवणूक

## कोकण, मराठवाडा, विदर्भात २० हजार रोजगार निर्मितीचे लक्ष्य

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात तब्बल ८१ हजार १३७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या सात विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमिती बैठकीत मंगळवारी मंजुरी देण्यात आली. कोकण, मराठवाडा, विदर्भात उभ्या राहणाऱ्या या प्रकल्पांतून सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम आयन सेल/बॅटरी, इलेक्ट्रिक व्हेईकल, सेमीकंडक्टर चिप्स, सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझर, फळांचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन करणाऱ्या सात प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार 'जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि.' कंपनी नागपूर भागात लिथियम बॅटरी निर्मितीचा अतिविशाल प्रकल्प उभारणार असून त्यामध्ये सुमारे २५ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पातून पाच हजारपेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे.

> राज्यात उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात आणखी उद्योग राज्यात येतील, याचा विश्वास आहे. – एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री



### मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय

- वसतीगृहे, आश्रमशाळांतील विद्यार्थी अनुदानात वाढ
- जुन्या जलविद्युत प्रकल्पांच्या आधुनिकीकरणास मान्यता
- आदिवासी सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज
- राज्यातील कारागृहे सुधारणांसाठी अध्यादेश
- यंत्रमाग सहकारी संस्थांना अर्थसहाय्य

'जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलिटी लि.' कंपनी छत्रपती संभाजीनगर इलेक्ट्रिक आणि हायब्रिड वाहन निर्मितीमध्ये २७ हजार २०० कोटींची गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पाच हजार २०० पेक्षा अधिक रोजगार निर्मिती होईल. तेथे वार्षिक ५ लाख विद्युतशक्तीवरील प्रवासी गाड्या व एक लाख व्यावसायिक गाड्यांच्या निर्मितीचे नियोजन आहे. 'हिंदुस्थान कोका कोला बेव्हरेजेस कंपनी' फळांचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन निर्मितीचा विशाल प्रकल्प रत्नागिरीत उभारणार आहे. यात १५०० कोटी गुंतवणूक होणार असून सुमारे २०० लोकांना रोजगार मिळण्याचा अंदाज आहे. 'आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनी' तळोजा, पनवेल आणि पुणे तसेच राज्याच्या अन्य भागांत सेमीकंडक्टर चिप्स निर्मितीचा एकात्मिक प्रकल्प उभारणार आहे. राज्यातील हा पहिलाच सेमीकंडक्टर निर्मिती प्रकल्प असेल.

पहिल्या टप्प्यात १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून चार हजारपेक्षा अधिक रोजगार निर्मिती होईल. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात सुमारे १२ हजार कोटींची गुंतवणूक होईल. महापे, नवी मुंबई येथे प्रकल्पाचे काम सुरू झाले असून, प्रायोगिक तत्त्वावर सप्टेंबर २०२४ पर्यंत उत्पादन सुरू होणार आहे. 'आवाडा इलेक्ट्रो कंपनी'चा सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझरचा एकात्मिक प्रकल्प नागपूरमधील बुटीबोरी आणि एमआयडीसी भोकरपाडा, ता. पनवेल जि. रायगड या परिसरात उभारण्यात येणार आहे.

नवीकरणीय ऊर्जा स्रोताचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित हा प्रकल्प असेल. प्रकल्पात १३ हजार ६४७ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून ८००० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होईल. 'परनॉर्ड रिकार्ड इंडिया प्रा. लिमिटेड'मार्फत मद्यार्क निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर येथे स्थापन करण्याचे नियोजित आहे.

प्रकल्पामध्ये १७८५ कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

# पुराच्या अभ्यासासाठी त्रिस्तरीय समिती

## सात दिवसांत अहवाल देण्याची सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खडकवासला धरणातून नदीपात्रात विसर्ग केल्यानंतर निर्माण झालेल्या पुराच्या कारणांचा अभ्यास करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यासाठी महापालिकेतील अधिकाऱ्यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती कारणांचा अभ्यास करून सात दिवसांत अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना केल्या जाणार आहेत.

सिंहगड रस्ता परिसर, डेक्कन परिसरातील पुलाची वाडीसह पाटील इस्टेट भागाला त्याचा सर्वाधिक फटका बसला होता. या पूर परिस्थितीला जबाबदार कोण, यावरूनही आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. नदीपात्रात टाकण्यात येत असलेला राडारोडा, नदीपात्रातील भराव आणि मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरूज्जीवन आणि सुशोभीकरण योजना पूरपरिस्थितीला कारणीभूत असल्याचा दावाही केला जात आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

पूर परिस्थिती निर्माण होण्यामागील नेमकी कारणे काय आहेत, याचा शोध समितीकडून घेतला जाणार आहे. महापालिकेतील बांधकाम, मलःनिस्सारण आणि पथ विभागातील प्रत्येकी एक-एक अधिकाऱ्याची समितीमध्ये नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच राज्याच्या जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यालाही समितीमध्ये निमंत्रित करण्यात येणार आहे. ही समिती सात दिवसांत कारणांचा अभ्यास करून कायमस्वरूपी उपाययोजना प्रस्तावित करणार आहे. पूर परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृती आराखडा केला जाणार आहे.

> पूर परिस्थितीचे मूळ कारण शोधले जाणार असून, त्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. सात दिवसांत ही समिती अहवाल सादर करेल. – पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

### भराव काढण्याची कार्यवाही सुरूच

**कर्वेनगर ते शिवणे या दरम्यानच्या नदीपात्रातील हरित पट्ट्यात भराव टाकून चार ते पाच एकर भूखंड निर्माण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आल्यानंतर भराव काढण्याची कार्यवाही महापालिकेकडून दुसऱ्या दिवशीही सुरूच राहिली. कर्वेनगर स्मशानभूमी, महालक्ष्मी लॉन्स, दांगट पाटील इस्टेट, राजाराम पूल परिसर, दुधाने लॉन्स येथे व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे. पूररेषेतील मातीचा भराव काढण्यात आला असून एका खासगी जागा मालकाला प्रादेशिक नगररचना अधिनियमातील कलमानुसार नोटीस बजाविण्यात आली आहे. पूर रेषेतील मातीचा भराव काढण्याचे काम कायम असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.**


**पुणे महानगरपालिका**

**निविदा प्रक्रिया कक्ष**

**मुदतवाढ निविदा जाहिरात**

**कामकाजाचे ठिकाण :** निविदा प्रक्रिया कक्ष, उप-आयुक्त, परिमंडळ क्र. ५, शिवाजी ढेरे उद्योग भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे महानगरपालिका

**निविदा विक्री कालावधी–**
दिनांक ३१/०७/२०२४ ते ०६/०८/२०२४, दु. २.०० पर्यंत.

**निविदा स्वीकृती कालावधी–**
दिनांक ३१/०७/२०२४ ते ०६/०८/२०२४, दु. २.०० पर्यंत.

**निविदा उघडणे कालावधी–**
दिनांक ०८/०८/२०२४, दु. १२.०० वाजता.

| अ. क्र. | खात्याचे नाव | मुदतवाढ निविदा क्रमांक |
|---|---|---|
| १) | कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय | PMC/DMC-5/ VISHRAM/2024-52 |

१) वरील टेंडर्सची विक्री व स्वीकृती **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरून फक्त ऑनलाईन चालू आहे.
२) बाकी सर्व मजकूर पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे कायम राहील.
३) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ(वि)/३२, दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस./ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहेत.

**उप-आयुक्त,**
परिमंडळ विभाग क्र. ५,
पुणे महानगरपालिका

**जाहिरात क्र. ०९-DC-५-२०२४**
**दिनांक : ३०/०७/२०२४**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली ऑफिस मिळकत मे. मॉडर्न क्रेडीट अँड कॅपिटल लिमिटेड यांनी विकसक मे. कोलते-पाटील डेव्हलपर्स यांचेकडून करारनामा दि. २१/०३/१९९५ यांस नों. क्र. हवेली-१/५०६१/१९९५ द्वारे खरेदी घेतलेली होती व तदनंर ऑफिस मिळकत मे. मॉडर्न क्रेडीट अँड कॅपिटल लिमिटेड यांचेकडून मे. संचार उद्योग लिमिटेड यांनी डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ यांस नों. क्र. हवेली-१/६३२३/१९९६ द्वारे खरेदी घेतलेली होती. सदरील द्वितीय मालक मे. संचार उद्योग लिमिटेड यांनी सदर ऑफिस मिळकत दि. १०/०५/२०११ रोजीचे डीड ऑफ ट्रान्स्फर यांस नों.क्र.हवेली-१२/६६३९/२०११ द्वारे विद्यमान मालक श्री. आमोद रमाकांत चिटणीस यास विक्री केलेली असून व सदरील ऑफिस मिळकत ही मालक म्हणून श्री. आमोद रमाकांत चिटणीस यांचे प्रत्यक्ष ताबेवहीवाटीत होती व आहे.

वर सांगितलेल्या ऑफिस मिळकतीचे प्रथम व द्वितीय मालकांचे अनुक्रमे १) करारनामा दि. २१/०३/१९९५ यांसी नों. क्र. हवेली-१/५०६१/१९९५ व २) डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ यांस नों. क्र. ६३२३/१९९६ हे दोन्ही अस्सल दस्त दुय्यम निबंधक हवेली क्र. १ यांचे कार्यालयातून सदरील प्रथम व द्वितीय मालक अथवा विद्यमान मालक श्री. आमोद रमाकांत चिटणीस या कोणासही कधीही प्राप्त झालेले नव्हते व नाहीत. सह-दुय्यम निबंधक हवेली क्र. १ यांनी सदरील करारनामा दि. २१/०३/१९९५ व डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ हे दोन्ही अस्सल दस्त त्यांचे "अभिलेखात आढळून येत नाहीत शोध चालू" अशा आशयाची पत्रे दि. ९/०२/२०१८ रोजी दिलेली आहेत. सबब सदरील दोन्ही अस्सल दस्त हे गहाळ झाले असलेविषयी विद्यमान मालक श्री. आमोद रमाकांत चिटणीस यांनी खडक पोलीस स्टेशन येथे (पुणे पोलीस चे वेबसाईट द्वारा) दि. १९/०२/२०१८ रोजी प्रॉपर्टी मिसिंग रिपोर्ट दिलेला असून सदर मिसिंग रिपोर्ट हा क्र. LR00912062018, ला नोंदवून घेण्यात आलेला आहे.

सदरील विद्यमान मालक श्री. आमोद रमाकांत चिटणीस, यांनी आमचे अशिल बँक ऑफ बडोदा, पुणे कॅम्प शाखा, पुणे यांचेकडे कर्जसुविधा मागणी केलेली असून त्याचे परतफेडीचे तारण/ हमीपोटी खालील परिशिष्ट मध्ये वर्णन केलेली मिळकत तारण/ गहाण देऊ केलेले आहे व सदरील ऑफिस मिळकत ही पूर्णतः निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा आमचे अशिलास दिलेला आहे व विशेषतः वर कथन केलेले अनुक्रमे १) करारनामा दि. २१/०३/१९९५ यांसी नों. क्र. हवेली-१/५०६१/१९९५ व २) डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ यांस नों. क्र. हवेली-१/६३२३/१९९६ हे दोन्ही अस्सल दस्त व त्यांच्या नोंदणीच्या पावत्या हे सदर विद्यमान मालकांनी अथवा पूर्वाश्रमीचे मालकानी कोणत्याही वित्तसंस्थेच्या अथवा त्रयस्थ व्यक्तीच्या ताब्यात दिलेली/ल्या नव्हती/त्या व नाही/त अथवा सदरील करारनामा दि. २१/०३/१९९५ व डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ हे दोन्ही अस्सल दस्त व त्यांच्या अस्सल नोंदणीच्या पावत्या याचे आधारे कोणताही बोजा अथवा हक्क अधिकार निर्माण केलेला नाही असा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे.

सदरील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली ऑफिस मिळकत तारण/ गहाण घेवून सदरील प्रस्तावित कर्जदारास कर्ज सुविधा देणेविषयीचा प्रस्ताव आमचे अशीलांचे विचाराधीन असून आमचे अशीलांकडे सदरील मिळकत तारण गहाण ठेवणेविषयी आमचे अशीलांशी बोलणी चालू आहेत व सदरची मिळकत पूर्णतः निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा प्रस्तावित कर्जदार आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, लिव-लायसेन्स, वहिवाट, हुकूमनामा, प्रलंबित दावा / अपील / अर्ज वगैरे, करारनामा, खरेदीखत, अन्न, वस्त्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास (विशेषतः सदरील करारनामा दि. २१/०३/१९९५ व डीड ऑफ ट्रान्स्फर दि. २९/११/१९९६ ह्या दोन्ही अस्सल दस्त व त्यांच्या अस्सल नोंदणीच्या पावत्या यांचे ताब्याचे आधारे) ही नोटीस प्रसिद्ध झाल्यादिवसापासून ८ दिवसांचे आत खालील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने आपली हरकत नोंदवावी व अस्सल कागदपत्रानिशी आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे व सदरची मिळकत पूर्णतः निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरील मिळकत तारण / गहाण ठेऊन कर्जाचा व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त राहतील. तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** तुकडी व जिल्हा पुणे, पोटतुकडी व तालुका हवेली मे. सबरजिस्ट्रार हवेली क्र. १ ते २७ यांचे कार्यक्षेत्रातील व गाव मौजे पर्वती, स.नं. ९/२, सिटी स. नं. ६६१५ आणि ६६१६, फायनल प्लॉट नं. ४९३ या मिळकतीवरील पाटील प्लाझा या इमारतीमधील दुसर्या मजल्यावरील ऑफिस नं. २१० हि ऑफिस मिळकत.

**श्री. हर्षवर्धन विनायक गाडगीळ**
**अँडव्होकट**
४८५ सदाशिवपेठ, टिळक रोड
पुणे, ४११०३०
मोबाईल नं- **७०३०३१९५३३**

पुणे
दिनांक : ३०/०७/२०२४


### मुठा नदीपात्रात वाहून गेलेला शाळकरी मुलगा अद्याप बेपत्ता

**पुणे :** मुठा नदीच्या पूना हॉस्पिटलजवळील पात्रात सोमवारी सायंकाळी वाहून गेलेला शाळकरी मुलगा अद्याप बेपत्ता असून, अग्निशामक दलाच्या जवानांकडून मंगळवारी संगम पूल, डेंगळे पूल परिसरात शोध घेण्यात आला.

पूना हॉस्पिटलजवळील एसएम जोशी पुलाच्या पात्रातही मोठ्या प्रमाणावर पाणी होते. तेथील एका बाकड्यावर एक शाळकरी मुलगा बसला होता. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तो अचानक नदीपात्रात पडल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. त्यामुळे अनेकांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. अग्निशामक दलाला घटनेची माहिती देण्यात आली. दलाच्या जवानांनी मुलाचा शोध सुरू केला. मात्र, रात्री उशिरापर्यंत त्याचा शोध लागू शकला नाही. मंगळवारीही सकाळपासून जवानांनी त्याचा शोध घेतला. महापालिका भवन, डेंगळे पूल, संगम पूल परिसरातील नदीपात्रात शोध घेण्यात आला. मात्र, अद्याप तो बेपत्ता असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# वायनाड येथील भूस्खलन अतिवृष्टीमुळे

## भूशास्त्र, पर्यावरण अभ्यासकांचे प्राथमिक निरीक्षण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** केरळमधील वायनाड येथील भूस्खलनाच्या दुर्घटनेमागे अतिवृष्टी हेच प्राथमिक कारण असल्याचे निरीक्षण भूशास्त्र, पर्यावरण संशोधक, अभ्यासकांनी नोंदवले आहे. सखोल अभ्यासाअंतीच अन्य कारणे समोर येऊ शकतात, असेही स्पष्ट करण्यात आले असून, माळीण येथे झालेल्या भूस्खलनाच्या दुर्घटनेला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या दिवशीच वायनाड येथे भूस्खलन होण्याचा दुर्दैवी योगायोग घडला.

> केरळमधील भूस्खलनाची दुर्घटना डोंगराळ भागात घडली आहे. त्या भागात जांभा दगड असल्याने त्यातून पाणी झिरपते. पाऊस प्रचंड झाल्यास दगडाखाली असलेला मातीचा भुसभुशीत थर वाहून जाऊ शकतो. वायनाड येथील भूस्खलन अशा प्रकारचे असल्याचे दिसते. ही दुर्घटना आपल्याकडे घडलेल्या तळीये, माळीण येथील दुर्घटनांसारखीच आहे. अन्य घटक कारणीभूत आहेत का, या बाबत सखोल अभ्यास करावा लागेल. – डॉ. नितीन करमळकर, ज्येष्ठ भूशास्त्रज्ञ

वायनाड जिल्ह्यातील मेप्पाडी भागात भूस्खलनाची दुर्घटना मंगळवारी घडली. या दुर्घटनेत आतापर्यंत ९३ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक लोक जखमी झाले आहेत. अद्यापही अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण दल (एनडीआरएफ), लष्कराचे जवान यांच्या मदतीने बचावकार्य करण्यात येत आहे. मात्र मुसळधार पावसामुळे बचावकार्यात अडथळे येत असल्याची माहिती मिळत आहे. इस्रोने तयार केलेल्या 'लँडस्लाइड ॲटलास ऑफ इंडिया'नुसार केरळचा समावेश भूस्खलनप्रवण राज्यांमध्ये होतो. भूस्खलन ही नैसर्गिक आपत्ती आहे. भूस्खलनाच्या घटना प्रामुख्याने माती, खडक, भूविज्ञान आणि उताराची अनुकूल परिस्थिती असलेल्या डोंगराळ भागात घडतात. उतारावरून खडक, दगड, मातीच्या अचानक होणाऱ्या हालचालींना भूस्खलन म्हटले जाते. अतिवृष्टी, भूकंप, बर्फ वितळणे आणि पूर अशी भूस्खलनाची काही नैसर्गिक कारणे आहेत. तसेच उत्खनन, डोंगरफोड, वृक्षतोड अशा मानवी हस्तक्षेपांमुळेही भूस्खलन होऊ शकते.

केरळमध्ये अशा स्वरूपाचे भूस्खलन या पूर्वीही झाले आहे. केरळ पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडून माती वाहून गेल्याने भूस्खलन झाल्याचे प्राथमिक कारण दिसून येते. उतारावरून चिखल वाहून गेल्याने त्याचा फटका मोठ्या परिसराला बसला, असे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदवले. पर्यावरण आणि भूगोल अभ्यासक डॉ. श्रीकांत गबाले म्हणाले, की पावसाचे प्रमाण जास्त असल्याने मातीचा थर वाहून जाणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. केरळमधील दुर्घटनेमध्ये तेच दिसून येते. ही दुर्घटना घडण्यामागे मानवी हस्तक्षेपासारखे काही घटक आहेत का, याचा स्वतंत्रपणे अभ्यास करावा लागेल.


महाराष्ट्र शासन

**सांस्कृतिक कार्य संचालनालय**

**भारतरत्न पं भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत**

**शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान**

भारतरत्न पं भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेंतर्गत शास्त्रीय संगीत क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांना सहाय्यक अनुदान योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी सहाय्यक अनुदान देण्यासाठी शास्त्रीय संगीत क्षेत्रात कार्य करणाऱ्या पात्र संस्थांकडून कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या महसूल विभागातुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विहित नमुन्यातील अर्ज व नियम **www.mahasanskruti.org** या संकेतस्थळावर- नविन संदेश या शीर्षकाखाली उपलब्ध आहेत. संस्थांनी अर्ज सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ३२. या पत्त्यावर अर्ज पाठवावेत. अर्ज दिनांक ३१ जुलै २०२४ ते २६ ऑगस्ट २०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत अर्ज उपलब्ध असून भरलेले अर्ज त्याच कालावधीत स्विकारले जातील.

डीजीआयपीआर/२०२३-२४/१४१०



लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

**नावात बदल**

माझे जुने नाव छाया साहेबराव मांदळे बदलून नवीन नाव सुनिता ज्ञानेश्वर जगदाळे झाले आहे अफिडेव्हिट नं. 793/2024.दिनांक - 29/07/2024.
0090355828-2

My old name was Asim Shakir Shaikh Changed to new name as Mohammed Asim Shaikh Vide Affidavit No. 3933/24 Dated 30/07/2024.
0090355815-10

I have changed my name after marriage from Vandana Madhav Khedlekar to Mrs. Manasi Shridhar Athavale. Affidavit no. 714/2024
0090355813-1

I have changed my old name Fatema to my new name as Fatema Khand Wala as per UID ON 29/07/2024
0090355825-1

My Old Name Abdul Gani Samad Chaudhari Changed as new name Abdul Gani Abdul Samad Chaudhary as per legal Documents.
0090355815-14

My Old Name Khairunnisa Samad Chaudhari Changed as new name Khairunnisa Abdul Samad Chaudhary as per legal Documents.
0090355815-15

My Old Name Mohanlal Saremal Jain Changed to new name as Mohan Saremal Jain as per relevant Documents.
0090355815-13

My Old name Priyanka Akshay Pawar Changed to new name as Priyanka Rajendra Parthe as per relevant Documents.
0090355815-12

My old name Iqbal Nasruddin Shaikh Changed to new name as Iqbal Nasir Shaikh Vide Affidavit No. 3927/24 Dated 30/07/2024
0090355815-5

My old name Mohammad Sayid Akhtar Ansari Changed to new name as Mohd Sayid Akhtar Ansari as per relevant Documents.
0090355815-16

My old name was Shahrukh Qadir Khan Changed to new name as Shahrukh Kadar Khan Vide Affidavit No. 3932/24 Dated 30/07/2024
0090355815-11

My old name was Shaheen Aziz Changed to new name as Shaheen Azizul Haque Shaikh as per relevant documents.
0090355815-1

My old name was Kadir Akbar Shaikh Changed to new name as Kadir Akbar Bagwan Vide Affidavit No. 3930/24 Dated 30/07/2024.
0090355815-8

My old name was Seema Shaikh Changed to new name as Seema Iqbal Shaikh Vide Affidavit No. 3926/24 Dated 30/07/2024
0090355815-4

My old name was Peerjade Ikhlaque Kasam changed to new name Iklakh Kasam Peerjade vide Aff. no. 2811/2024 dtd. 23/07/2024
0090355829-1

I have changed my old name Swati Sanjay Dyahadi to new name Chanda Sanjay Dyahadi.
0090355734-1

My old name was Iqbal Shaikh Changed to new name as Iqbal Nasir Shaikh Vide Affidavit No. 3925/24 Dated 30/07/2024
0090355815-3

My old name was Farjana Kadir Shaikh Changed to new name as Farzana Kadir Bagwan Vide Affidavit No. 3931/24 Dated 30/07/2024.
0090355815-9

My old name was Asim Hajishakir Shaikh Changed to new name as Mohammed Asim Shaikh Vide Affidavit No. 3929/24 Dated 30/07/2024
0090355815-7

visit us at WWW.LOKSATTA.COM

My old name Mohammed Palghat Koya Changed to new name as Koya Pmohammed Phyder Vide Affidavit No. 3924/24 Dated 30/07/2024
0090355815-2

My old name Mohammed Asim Mohammed Shakir Shaikh Changed as new name Mohammed Asim Shaikh Vide Affidavit No. 3928/24 Dated 30/07/2024.
0090355815-6

**हरवले-सापडले**

**हरवले** आहे- खालील कंपन्यांचे सेल्स टॅक्स चे 'सी' फॉर्म/'एच' फॉर्म हरवले आहेत. आणून देणाऱ्यास योग्य बक्षीस देण्यात येईल. **1.** RGM International P.Ltd. **2.** Hitech International **3.** Shirdi Sai Electricals **4.** Sarda Mines P.Ltd. **5.** PME Transpower (I) Solutions **6.** Universal Electro Magnetic Cores **7.** Jaypee Rewa Plant **8.** Messon Electricals Call Expert Systems - 9767579191.
0090355801-2

**शैक्षणिक विशेष**

**कोचिंग क्लासेस**

**CBSE / ICSE/SSC** TUTIONS I to X All Subjects Porwal Road LOHEGAON Pune Flexible Time - CALL 7517892718
0050246959-1

**जागासंबंधी**

**प्लॉट विक्रीविषयक**

**डहाणू, पालघर, नासिक, इगतपुरी, बदलापुर, कर्जत, पनवेल परिसरात बंगले फार्म प्लॉट बुकिंगसाठी - 9699505226/ 9272019484**
0070914846-1

**कोकणात पाच एकर १० ते १८ लाखात. चिरेबंदी बागेची घर अकरा लाखांपासून. गोवा बीच, माणगाव, अलिबाग, पाली, कर्जत, लोणावळा, पावनामुळशी, पाचगणी लेक प्लॉटसाठी- 8976458460/ 8828337316.**
0070914890-1

**चला कोकणात दहा एकर जमीन २५००००० गोवा मुंबई पुण्याजवळ रोहाऊसेस घर, विविध पर्यटनस्थळी नदी डॅम समुद्रलगत प्लॉट बुकिंगसाठी- 8080866361/ 8828337316.**
0070915492-1

**सर्व्हिसेस**

**जाहिरातविषयक**

**HIGHTECH** Mumbai's Experts (Sarvodaya Advertising) लोकसत्ता+ सर्वच वर्तमानपत्रांत स्कीम+ डिस्काउंट विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या जाहिराती प्रसिद्धीसाठी. 9321989026/ 9322277986.
0070908552-1

**नोकरीविषयक**

**Wanted** Sst And Primary Teacher For An English Medium School In Pimpri. Graduates Can Apply Contact- 9890867830 P.C.M.C Candidate Preffered.
0090355744-1

**विवाहविषयक**

**मॅरेज ब्युरो**

**।। पवित्र विवाह ।। सौ. कुळकर्णी विवाहसंस्था. इंजिनीअर्स, डॉक्टर्स, CA, MBA, बँकर्स, सरकारी नोकरी, NRI, सुशिक्षित सर्व जातींच्या वधूवरांची भरपूर स्थळे. 8369692734/ 8450914835/ 9892625606.**
0070856738-9

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग दर रविवारी 'लोकसत्ता'तून जीवनसाथी

**भविष्यविषयक**

**ॲस्ट्रॉलॉजी :** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे- सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ योगीनिवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070912268-1

**हेल्थ व फिटनेस**

**Natural** Fitness Course for Male Happy Marriage Life.Satyam Clinic, Near Kate Puram Chowk, Pimple Gurav, Pune. Contact : 9623060011
0090353518-1

For Classified Ads Contact
HARSH SHAH
9158296966

**यात्रा विशेष**

**यात्रासहल**

**श्रीरामकृष्ण- गिरनार- परिक्रमा- सौराष्ट्रदर्शनसह- ०६-११-२०२४ //संपुर्ण - मध्यप्रदेश- २३-११-२०२४ //सिक्कीम- दार्जिलींग- लाचुंगसह- १२-११-२०२४ //कुरवपुर- पिठापुर- पुरीकोणार्कसह- १४-१०-२०२४/ १६-१२-२०२४ //नर्मदापरिक्रमा- ०५-११-२०२४/ २१-११-२०२४/ १६-१२-२०२४// //कुरूक्षेत्र- महाभारतकथा- वृंदावन- मथुरासह- कथाकार- अजेयबुवा- सज्जनगड- ०१-०१-२०२५// नैमिष्यारण्यात- भागवत- त्रिस्थळीयात्रा- अयोध्येसह- १३-१०-२०२४ //चारधामयात्रा- १४-१०-२०२४/ कर्नाटक- १५-१०-२०२४ // बापट- 9137001395/ 9820023106**
0070897793-9

दोस्तीटूर *शास्त्रोक्त नर्मदापरिक्रमा *कुरवपुरम- पिठापुरम *त्रिस्थळी- अयोध्या- नैमिष्यआरण्य *केरळ-तमिळनाडू *चारधामयात्रा *भुतान *आसाम- पूर्वांचल *नेपाळ *कोस्टल कर्नाटका *श्रीलंका. 9594880123/ 9702251584
0070915287-1

लोकसत्ता Classifieds

**विनोद** हॉलिडेज्च्या दर्जेदार सर्व खर्च समाविष्ट सहली केरळ- कन्याकुमारी- रामेश्वर- मदुराई- ३५९५०/-, राजस्थान- मेवाड- मारवाड- ३५९५०/- नेपाळ- जनकपूर- ३२९५०/-, काशी- गया- प्रयाग- अयोध्या- २४९५०/-, संपूर्ण मध्यप्रदेश- ४१९५०/-, काश्मिर लेहलडाख- ४४९५०/-, पुरी- भुवनेश्वर- कलकत्ता- गंगासागर- २५९५०/-, छत्तीसगढ- चित्रकोट वॉटरफॉल्स- २४९५०/-, नर्मदा परिक्रमा- ३८९५०/-. संपर्क : ९३७२९१०४१४/ ९८६९५७३०९७.
0070915460-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

देशपांडे ट्रॅव्हल्स
www.deshpandetours.com
चारधाम यात्रा
हरिद्वार-ऋषिकेशसह 13 दिवस
23 सप्टेंबर, 3, 14 ऑक्टोबर
3 टायर एसी, ₹33,500/- प्रत्येकी
ओडिसा-पुरीसह
10 दिवस, 3, 10 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹27,500/- प्रत्येकी
बंगलोर-मैसूर
उटी-कुर्ग-मंगलोरसह
11 दिवस, 5 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹29,500/- प्रत्येकी
केरळ-कन्याकुमारी
रामेश्वर-मदुराईसह
13 दिवस, 5 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹35,500/- प्रत्येकी
राजस्थान-मेवाड
मारवाडसह
13 दिवस, 5 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹33,500/- प्रत्येकी
गोल्डन ट्रँगल
दिल्ली-आग्रा-मथुरा
जयपूर-वृंदावनसह
8 दिवस, 6, 13, 19 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹26,500/- प्रत्येकी
नैनीताल-राणी खेत
जिम कॉर्बेट-कौसानी
हरिद्वारसह
10 दिवस, 7, 14 नोव्हेंबर
3 टायर एसी, ₹28,500/- प्रत्येकी
EMI पर्याय उपलब्ध
रेल्वे रिझर्व्हेशन १२० दिवस अगोदर होते.
9820962500
9819453043
0070905414-47-1

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

लोकसत्ता [पुणे]
१६ बुधवार, ३१ जुलै २०२४

# अल्पवयीनांचा वेग आवरणार कोण?

## अपघातांच्या प्रमाणातही वाढ; भरधाव वाहने चालविणाऱ्या ४३ मुलांवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शहरात अल्पवयीन मुलांकडून वेगाने वाहन चालवून अपघात करण्याचे प्रमाण वाढले असून, गेल्या सहा महिन्यांत ४३ मुलांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहनचालक अल्पवयीनांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असला, तरी हे प्रकार सुरूच आहेत. गंभीर अपघात घडल्यानंतर मुलांना वाहन चालविण्यास देणाऱ्या पालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. मात्र, या वाढत्या प्रकारांमुळे अल्पवयीनांच्या वेगाला आवर घालणार कोण असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबविली. अल्पवयीन मुलांवर कारवाई करण्यात आली. गेल्या सहा महिन्यांत विनापरवाना वाहन चालविणाऱ्या ७३३ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. हडपसर, येरवडा, लोणीकंद, कोरेगाव पार्क, दत्तवाडी, लोणी काळभोर, सहकारनगर, वारजे माळवाडी या भागात विना परवाना वाहन चालविण्याचे प्रमाण जास्त असल्याचे पोलिसांनी सांगितले.

- गंभीर गुन्ह्यात अल्पवयीनांकडून वाहनांचा वापर केल्याचे दिसून आले आहे. गेल्या महिनाभरात वाहतूक पोलिसांनी वाहन चालविणाऱ्या ११ मुलांविरुद्ध कारवाई केली.
- कल्याणीनगर भागातील अपघात प्रकरणात बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालच्या मुलाला ताब्यात घेण्यात आले होते. अल्पवयीन मुलाला महागडी मोटार ताब्यात दिल्याप्रकरणी त्याचे वडील विशाल यांच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला.
- कोंढवा भागात सराव करणाऱ्या कुस्तीपटू युवतीला भरधाव डंपरने धडक दिल्याची घटना जून महिन्यात घडली होती. याप्रकरणात डंपरचालक मुलाला ताब्यात घेण्यात आले. मुलाचे वडील, तसेच डंपरमालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

### महिनाभरात ११ मुले ताब्यात



# पूरग्रस्तांना पाच हजारांऐवजी भरीव मदत करावी

## माजी आमदार मोहन जोशी यांची मागणी

**पुणे :** मुठा नदीकाठच्या पूरग्रस्तांना राज्य सरकारने ५ हजारांची अपुरी मदत न देता नुकसानीच्या प्रमाणात भरीव मदत द्यावी, आणि मदतीचे वाटप त्वरित व्हावे, अशी मागणी माजी आमदार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली आहे.

गेल्या आठवड्यात जोरदार पावसामुळे नदीला पूर आला होता. पुराचे पाणी नदीकाठच्या वसाहती आणि सोसायट्यांमध्ये शिरले. पुरामुळे रहिवासी, छोटे दुकानदार यांचे अतोनात नुकसान झाले आहे. काहींचा संसार वाहून गेला. दुचाकी, चारचाकी वाहनांचे नुकसान झाले. त्याचे पंचनामे झाले आहेत. नुकसान झालेल्यांना नियमानुसार पाच हजार रुपये रकमेची मदत दिली जाते. पण, त्या ऐवजी नुकसानीच्या प्रमाणात मदत देण्यात यावी, अशी मागणी जोशी यांनी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्याकडे केली. नदीच्या पूररेषेबाबतही त्यांनी चर्चा केली. पूररेषा लवकरच निश्चित केली जावी आणि त्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणीही केली. या वेळी चेतन अगरवाल, सुरेश कांबळे आणि राजेंद्र परदेशी उपस्थित होते.



**मुठा नदीच्या पूना हॉस्पिटलजवळील पात्रात सोमवारी एक शाळकरी मुलगा वाहून गेला. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून नदीपात्राच्या रस्त्यावर मंगळवारी पोलीस तैनात होते.**

# एकवीस लाखांचे मेफेड्रोन जप्त

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** मेफेड्रोन (एमडी) विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या राजस्थानमधील दोघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने अटक केली. त्यांच्याकडून २१ लाख ३८ हजार रुपयांचे १०६ ग्रॅम मेफेड्रोन, तसेच दुचाकी असा २२ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कात्रज परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे.

श्रवणसिंह बलवंतसिंह राजपूत (वय २२), महेश पुनाराम बिश्नोई (वय २०, दोघे सध्या रा. तुळजाभवानीनगर, खराडी, मूळ रा. कुशलावा, जि. जोधपूर, राजस्थान) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. राजपूत आणि बिश्नोई मेफेड्रोन विक्री करण्याच्या तयारीत होते.

याबाबतची माहिती अमली पदार्थविरोधी पथकातील अधिकाऱ्यांना मिळाली. कात्रज परिसरात दोघे जण दुचाकीवरून येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा लावून दोघांना पकडले. त्यांच्याकडून मेफेड्रोन आणि दुचाकी जप्त करण्यात आली.

अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक पंडित रेजितवाड, रामकृष्ण दळवी, दिगंबर चव्हाण, चेतन गायकवाड, रवींद्र रोकडे, प्रशांत बोमदांडी, संदीप जाधव यांनी ही कारवाई केली.

# पुण्यात कधीही काहीही घडू शकते...

शहरबात

राहुल खळदकर

**पुण्यात कधीही** काहीही घडू शकते. अचानक रस्त्यावर भांडणे सुरू होतात. भांडणामुळे वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या रांगा लागतात. किरकोळ कारणावरून वाहनचालकांमध्ये वाद होतात आणि प्रकरण थेट पिस्तूल रोखून जीवे मारण्यापर्यंत पोहोचते. रस्त्यावर झालेल्या किरकोळ वादाचे पर्यवसान हाणामारीपर्यंत होते. शहरात गेल्या काही दिवसांत अशा प्रकारच्या घटना वाढीस लागल्या असून, अशा प्रकारच्या घटनांमुळे पुण्याच्या लौकिकाला गालबोट लागत असून, किरकोळ वादातून थेट खुनाचा प्रयत्न, मारामारी, खून अशा प्रकारच्या घटनांमुळे एकंदर समाजजीवनात वावरणे तितकेसे सोपे नाही, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

पुण्यातील वाहतूक समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे. शहराचा वाढता विस्तार, वाहनांची संख्या, अरुंद रस्ते अशा अनेक समस्या आहेत. वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी पोलिसांचे संख्याबळ अपुरे आहे. प्रत्येक चौकात पोलीस नेमणे परवडणारे नाही. वाहनचालकांनी स्वयंशिस्त पाळल्यास अनेक प्रश्न मार्गी लागतील. वाहतूक कोंडी हा वेगळा विषय आहे. शहरात विकासकामे सुरू आहेत. वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक मेटाकुटीला आले आहेत. पादचाऱ्यांना रस्त्यांवरून चालणे देखील अवघड झाले आहे.

वाहतूक कोंडी, समस्या हा वेगळा प्रश्न आहे. मात्र, रस्त्यावर वाहनचालकांमध्ये वाद झाल्यास प्रकरण थेट हाणामारीपर्यंत पोहोचते, हे बिघडलेल्या समाजस्वास्थ्याचे लक्षण आहे, असे म्हणणे गैर ठरणार नाही.

पुणे शहरात गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटना विचारात घेतल्यास 'वाटेवरती काचा गं', अशी परिस्थिती आहे. कामाच्या व्यापात, धावपळीत असलेले वाहनचालक कधी हमरीतुमरीवर येतील, याचा नेम नाही. विश्रांतवाडी भागात नातेवाइकांच्या विवाहासाठी गेलेल्या मोटारचालक तरुणावर हॉर्न वाजविण्याच्या वादातून पिस्तूल रोखण्याची घटना नुकतीच एका मंगल कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर घडली. मोटारचालक तरुणाचा पाठलाग करून कोयत्याने वार करण्यात आला. दैव बलवत्तर होते म्हणून तरुण बचावला. अशाच प्रकारची घटना पाषाण-बाणेर रस्त्यावर घडली. एका तारांकित हॉटेलमध्ये व्यवस्थापक असलेली तरुणी दुचाकीवरून निघाली होती. भरधाव वेगाने तेथून मोटारचालक गेला. पावसामुळे खड्ड्यात पाणी साचले होते. चिखल उडाल्याने पुढे जाऊन तरुणीने मोटारचालकाला मोटार हळू चालविण्यास सांगितले. 'पावसाळ्याचे दिवस आहेत. खड्ड्यातून मोटार नेल्यास चिखल उडतो', असे तरुणीने मोटारचालकाला सांगितले. त्यानंतर मोटारचालक भडकला आणि त्याने थेट दुचाकीस्वार तरुणीचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावर दुचाकीला मोटार आडवी घालून मोटारचालकाने तरुणीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्याने थेट तरुणीच्या नाकावर ठोसा मारला आणि काही क्षणात तरुणी रक्तबंबाळ झाली. हे सगळे सुरू असताना मोटारचालकाच्या पत्नीने तरुणीला शिवीगाळ केली. या घटनेनंतर नागरिकांनी पकडून मोटारचालकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. चतुःश्रृंगी पोलिसांनी मोटारचालक आणि त्याच्या पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

हे प्रकरण ताजे असतानाच कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या पुणे पोलीस दलातील पोलीस शिपायाला कर्तव्याचा विसर पडला. बंडगार्डन रस्त्यावर पीएमपी बस शेजारून गेल्याने चिडलेल्या पोलीस शिपायाने पीएमपी बसला दुचाकी आडवी घातली. भरस्त्यात पीएमपी थांबल्याने वाहतूक विस्कळीत झाली. 'बस जोरात का नेली?' अशी विचारणा करून पोलीस शिपाई थेट बसचालकाच्या केबिनमध्ये शिरला. पीएमपी चालकाला पोलीस शिपायाने थेट मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी पीएमपी चालकाने मारहाण करणाऱ्या पोलीस शिपायाला 'माझी काय चूक झाली?' अशी विचारणा केली. पोलीस शिपायाने पीएमपी चालकाची बाजू ऐकून न घेता त्याला मारहाण सुरूच ठेवली. पीएमपी बसमधील एका प्रवाशाने मोबाइलवर चित्रफीत काढून ती समाज माध्यमात प्रसारित केली. पोलीस शिपायाची मुजोरी पाहून नागरिकांनी संताप व्यक्त केला. हे प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले. मात्र, पोलीस ठाण्यातील वरिष्ठांनी हे प्रकरण शांत केले. दोघेही शासकीय कर्मचारी असल्याने त्यांच्यातील वाद सामोपचाराने मिटला. पोलीस शिपायाने पीएमपी चालक आणि वाहकाची माफी मागितली. मात्र, समाज माध्यमात प्रसारित झालेली चित्रफीत पाहून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले. पोलीस शिपायाचे कृत्य पोलीस दलाची प्रतिमा मलिन करणारे असल्याचा ठपका ठेवून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या पोलीस शिपायाला निलंबित केले.

चार महिन्यांपूर्वी लष्कर भागातील छत्रपती शिवाजी मार्केट परिसरातील अरुंद गल्लीत दुचाकी पुढे नेण्याच्या कारणावरून दुचाकीस्वार तरुणी आणि तिच्या आईला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी दुचाकीस्वार आणि त्याच्याबरोबर असलेल्या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दोन वर्षांपूर्वी थरकाप उडवणारी घटना हडपसर-सासवड रस्त्यावर घडली होती. एका मोटारचालक तरुणाचा किरकोळ वादातून कोयत्याने वार करून टोळक्याने खून केला होता. मोटार खड्ड्यातून नेल्याने अंगावर चिखल उडाल्याने टोळक्याने तरुणावर हल्ला केला. पंचविशीत असलेल्या मोटारचालक तरुणाचा रस्त्यावर झालेल्या वादातून खून झाल्याने खळबळ उडाली होती. धकाधकीच्या जीवनात किरकोळ वाद होत असतात. एकेकाळी शांत शहर अशी ओळख असलेले पुणे आता महानगर झाले आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे पुण्याच्या नावलौकिलाला गालबोट लागते. पुण्यात शिक्षण, व्यवसाय, नोकरीसाठी स्थायिक होणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत असून, अनेकजण पुण्यात वास्तव्य करण्यास प्राधान्य देतात. मात्र, किरकोळ वाद जीवघेणे ठरू लागल्याने पुण्याच्या नावलौकिकाला बट्टा लागत आहे.

rahul.khaladkar@expressindia.com

# मान्सूनच्या वर्तनात बदल

## डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांचे मत



लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** एखाद्या परिसरात कमी काळात प्रचंड पाऊस, दुसरीकडे दुष्काळी परिस्थिती, अवेळी गारपीट, उष्णतेच्या लाटा हे सर्व हवामानातील बदलांचे दृष्य परिणाम आहेत. तसेच मान्सूनचे वर्तन बदलते आहे. मुसळधार ते अतिमुसळधार या श्रेणीत बरसणाऱ्या पावसाचे प्रमाण वाढले असून, त्याचा शेतीसाठी उपयोग होताना दिसत नाही, असे निरीक्षण भारतीय हवामान विभागाचे उपमहासंचालक डॉ. कृष्णानंद होसाळीकर यांनी नोंदवले.

भवताल फाउंडेशनतर्फे नागरिकांसाठी हवामान वेधशाळा क्षेत्रभेट उपक्रमावेळी डॉ. होसाळीकर बोलत होते. भवताल फाउंडेशनचे संस्थापक संचालक अभिजित घोरपडे उपस्थित होते. या क्षेत्रभेटीमध्ये पाऊस, तापमान, मातीचे तापमान मोजण्याची उपकरणे दाखवण्यात आली. तसेच बाष्पीभवन, दवबिंदू मापन, सूर्यकिरणांची तीव्रता मोजणे याची माहिती देण्यात आली.

होसाळीकर म्हणाले, की हवामानातील बदलांना माणसाची कृती जबाबदार आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गात मानवाचा वाढता हस्तक्षेपच या परिस्थितीला कारणीभूत आहे. शाश्वत विकास हे त्यावरचे एकमेव उत्तर आहे. राज्यातील डोंगराळ भागांमध्ये होणाऱ्या ढगफुटीच्या घटना आता शहरातही घडतात. नागरिकांमध्ये पर्यावरण-निसर्ग विषयक जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांना या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रकारच्या भेटी उपयुक्त ठरतील, असे घोरपडे यांनी सांगितले.

# राष्ट्रीय लोक अदालतीत एक लाख दावे निकाली

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय लोक अदालतीत एक लाख ५१७ दावे निकाली काढून पुणे जिल्ह्याने राज्यात पुन्हा प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये ३३ हजार ६९५ प्रलंबित आणि ६६ हजार ८२२ वादपूर्व दाव्यांचा समावेश होता.

राष्ट्रीय लोक अदालतीचे नुकतेच आयोजन करण्यात आले. लोक अदालतीत बँकेचे कर्जवसुली दोन हजार ७८०, तडजोड पात्र फौजदारी २५ हजार ९४७, वीज देयक १०१, कामगार विवाद खटले १००, भूसंपादन ४८, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण १३१, वैवाहिक विवाद ११३, धनादेश न वटणे (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट) ३ हजार ४८, अन्य दिवाणी ८७५, महसूल ७ हजार ५३७, पाणी कर ५४ हजार ७८, तसेच अन्य ५ हजार ७५९ प्रकरणे असे एकूण मिळून एक लाख ५१७ दावे निकाली काढण्यात आले. प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव सोनल पाटील यांनी दिली. तडजोडीसाठी ठेवण्यात आलेल्या दोन लाख ८० हजार ९६८ दाव्यांपैकी एक लाख ५१७ दावे निकाली निघाले. त्यापोटी ४१९ कोटी दोन लाख ४९ हजार ८३३ रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. वादपूर्व १ लाख ८२ हजार ११५ प्रलंबित दाव्यांमधून ६६ हजार ८२२ दावे निकाली काढण्यात आली. त्यापोटी ९० कोटी ६९ लाख ३८ हजार ८३३ तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. तर प्रलंबित ३ लाख ३० हजार ५८८ दाव्यांपैकी ९८ हजार ८५३ सुनावणीसाठी ठेवण्यात आले. त्यापैकी ३३ हजार ६९५ दावे निकाली काढून ३२८ कोटी ३३ लाख ११ हजार ५० तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. लोकअदालत यशस्वी होण्यासाठी सर्व न्यायालयातील तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि पक्षकारांनी सहकार्य केले.

# ऑनलाइन भाडेकरारांच्या नोंदणीला विलंब

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवडमधील दस्त नोंदणी कार्यालयात ऑनलाइन भाडेकराराचे (लिव्ह ॲण्ड लायसन्स) दस्त नोंदविण्यास विलंब लागत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

राज्यातील ग्रामीण भागातून आणि परराज्यांमधून पुण्यात नोकरी, शिक्षणानिमित्त येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. या नागरिकांना रहिवास पुरावा, दुचाकी किंवा चारचाकी वाहन खरेदी, शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेशासाठी, गॅस नोंदणी, पारपत्र, विवाह नोंदणी अशा विविध कारणांसाठी ऑनलाइन भाडेकरार ग्राह्य धरण्यात येतो. आरटीई प्रवेशासाठी अर्ज करायचा असल्यास अर्ज भरण्यापूर्वीचा किंवा अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी भाडेकरार नोंदणीकृत असणे शिक्षण विभागाने बंधनकारक केले आहे. १०० आणि ५०० रुपयांच्या मुद्रांकावरील भाडेकरार आता कालबाह्य झाला असून नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडील ऑनलाइन भाडेकराराला आता कायदेशीर म्हणून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे ऑनलाइन भाडेकरार करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. मात्र, अनेकदा नोंदविलेला दस्त तातडीने मिळत नाही. ऑनलाइन भाडेकरार केल्यावर २० ते २५ दिवसांनी हे दस्त नोंदविले जात असल्याने नागरिकांना त्रास होतो. या पार्श्वभूमीवर पुणे शहरात 'शून्य प्रलंबितता' अभियान राबविण्याचे आदेश शहराचे मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांनी गेल्या वर्षी दिले होते.

> **पुणे शहरचे मुद्रांक जिल्हाधिकारी वैद्यकीय सुटीवर असल्यामुळे ऑनलाइन भाडेकरार नोंदवून येण्यासाठी वेळ लागत आहे. २४ तासांत नोंद होणाऱ्या दस्ताला आठ दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागत आहे. वस्तू व सेवा करासाठी अर्ज करणे, आरटीई अंतर्गत प्रवेश, पारपत्र अशा महत्त्वाच्या कामांसाठी लागणारे भाडेकरार नोंदणी होऊन येण्यास वेळ लागत असल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे.**
>
> – सचिन शिंगवी, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ सर्व्हिस प्रोव्हायडर

# पुणे रेल्वे स्थानकावर आता 'रिक्षामित्र'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे रेल्वेस्थानकावर रिक्षाचालक प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारत असल्याचे प्रकार वारंवार समोर येत होते. चालकांकडून सुरू असलेली प्रवाशांची ही लूट रोखावी, अशी मागणी होती. यासाठी रेल्वेस्थानकावर 'रिक्षामित्र' ही प्रीपेड रिक्षासेवा सुरू झाली आहे. यामुळे रिक्षाचालकांच्या मनमानी भाडे आकारणीला चाप बसला आहे.

रेल्वे स्थानकावरील प्रीपेड रिक्षा बूथ करोना संकटाच्या काळात सुरू होते. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर ते बंद झाले. प्रीपेड बूथ बंद झाल्यानंतर काही रिक्षाचालकांनी प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारण्यास सुरुवात केली. याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जात आहेत. अखेर चार वर्षांनी प्रीपेड बूथ पुन्हा सुरू करण्याची पावले उचलण्यात आली. यासाठी रेल्वे प्रशासन, वाहतूक पोलीस, प्रादेशिक परिवहन कार्यालय, महापालिका आणि रिक्षा संघटनांनी पुढाकार घेतला. स्थानकावर रिक्षामित्र सेवेचे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झाले. बूथमध्ये मीटरनुसार प्रवाशाला भाडे आकारले जाते. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी मार्गाचे ट्रॅकिंग मोबाइलवरून पाहता येते. सुविधा नातेवाइकांनाही मिळते,' अशी माहिती 'बघतोय रिक्षावाला फोरम'चे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी दिली.

> **फसवणूक होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी प्रीपेड सेवा सुरू करण्यात आली आहे. 'रिक्षामित्र ही सेवा जुन्याच प्रीपेड रिक्षा बूथमध्ये सुरू केली आहे. आहे. यासाठी रिक्षाचालकांची नोंदणीही करण्यात आली आहे.**




### अशी असेल प्रीपेड रिक्षा सेवा...

- प्रवाशाला बूथमध्ये जाऊन प्रवासाचे ठिकाण सांगावे लागेल.
- कर्मचारी मीटरनुसार भाडे सांगतील.
- प्रवाशाला बूथमधून देयकाची एक पावती मिळेल.
- इच्छितस्थळी पोहोचल्यानंतर पावतीवरील रक्कम प्रवासी रिक्षाचालकाला देईल.
- प्रवासादरम्यान बूथमधील कर्मचारी, प्रवासी रिक्षाचा प्रत्यक्षातील मार्ग पाहू शकतील.
- प्रवाशांचे नातेवाइकही रिक्षाचा मार्ग ऑनलाइन मोबाइलवर पाहू शकतील.

### रिक्षाचालकांना प्रोत्साहनपर सवलती

उद्घाटनावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रिक्षाचालकांना प्रोत्साहनपर सवलती देण्याची घोषणा केली. बूथवरील सुविधा निःशुल्क असेल. नोंदणीकृत रिक्षाचालकांना दोन गणवेश मोफत दिले जातील. चालकांना महिना एक हजार रुपयांचे सीएनजीचे कूपन दिले जाईल. तसेच, त्यांना अल्प दरामध्ये रिक्षाचे सुटे भाग देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. रिक्षाचालक व त्यांच्या कुटुंबीयांना दरमहा मोफत दंतचिकित्सा, डोळ्यांची तपासणी व चष्मेवाटप तसेच रक्त तपासणी व 'एक्स-रे'ची सुविधा देण्यात येईल,' असे ते म्हणाले.

# पीएमपीच्या काही मार्गात उद्या बदल

**पुणे :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पीएमपीच्या काही मार्गात गुरुवारी (१ ऑगस्ट) बदल करण्यात येणार आहे. एकूण साठ मार्गांमध्ये हा तात्पुरता बदल असेल, अशी माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली.

गुरुवारी दुपारनंतर बदल होणार आहे. स्वारगेट परिसरातील जेधे चौक, सारसबाग रस्ता बंद झाल्यानंतर वाहतूक दुपारच्या सत्रात लक्ष्मी नारायण चित्रपटगृहाकडून डाव्या बाजूला वळवून मित्र मंडळ चौक, सारसबाग मार्गे सुरू ठेवण्यात येईल. स्वारगेट येथील नटराज बस स्थानकाचा रस्ता बंद झाल्यानंतर स्थानकावरून सुटणाऱ्या गाड्या खंडोबा मंदिर, पर्वती पायथा येथून सुटतील.

## संक्षिप्त

### आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन

**जागतिक निसर्गसंवर्धन** दिनानिमित्त कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. सायरस एस. पूनावाला हायस्कूल येथे आयोजित आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेत सात शाळांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत रास्ता पेठेतील डॉ. सायरस एस. पूनावाला हायस्कूलने प्रथम, तर वाकड येथील युरो स्कूलने द्वितीय क्रमांक पटकावला. शुभम पांडे यांनी जैवविविधता, निसर्गसंवर्धन या विषयावर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्णिका व्यास आणि मुख्याध्यापिका काजल एस. सोमई यांच्या हस्ते स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

### पांचजन्य फाउंडेशनतर्फे रक्तदान शिबिर

**शहरातील रक्ताचा** तुटवडा ध्यानात घेऊन पांचजन्य फाउंडेशन आणि जनकल्याण रक्तपेढी यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ६५ जणांनी रक्तदान केले. जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश कश्यप यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. पांचजन्य फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ राजे, सचिव समीर कुलकर्णी, सहसचिव रश्मिन कुलकर्णी, कोषाध्यक्ष पीयूष कश्यप, विश्वस्त चंद्रभूषण जोशी, राजस जोशी, मंगेश देशपांडे, जनकल्याण रक्तपेढीच्या डॉ. मधुरा बर्वे या वेळी उपस्थित होत्या.

### केंद्र सरकारविरोधात शाळेसमोर आंदोलन

**शैक्षणिक साहित्यावरील** वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) शून्य करावा, या मागणीसाठी एरंडवणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने कर्वे रस्त्यावरील विमलाबाई गरवारे शाळेसमोर केंद्र सरकारविरोधात आंदोलन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष प्रशांत वेलणकर, सचिव सतीश खैरे, खजिनदार सुरेश निंबाळकर, उत्सवप्रमुख राजू मोतीवाले, सुमंगल वाघ, भारती घारे, आशिष वेलणकर, मधू जोगावडे यांच्यासह मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेत या विषयासंदर्भात विद्यार्थी आणि पालकांमध्ये जागृती केली.

### नाट्यछटा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**नाट्यसंस्कार कला** अकादमीतर्फे घेण्यात आलेल्या दिवाकर स्मृती नाट्यछटा स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच झाली. विविध गटांमध्ये विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना एकपात्री कलाकार प्रभाकर निलेगावकर यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. अकादमीचे प्रमुख विश्वस्त प्रकाश पारखी, संध्या कुलकर्णी, अभिनेता नचिकेत देशपांडे, पूजा पारखी, आरती दाते, सायली पाटील, प्रसन्न सोहनी या वेळी उपस्थित होते.

### अर्थतज्ज्ञ रारावीकर यांना पुरस्कार प्रदान

**स्वरगायत्री प्रतिष्ठानाच्या** वतीने प्रसिद्ध लेखक आणि अर्थतज्ज्ञ डॉ. आशुतोष रारावीकर यांना उद्योजक विजयकुमार मर्लेचा यांच्या हस्ते राष्ट्रसेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका चारुशीला बेलसरेलिखित 'माझे जीवनगाणे' या पुस्तकाचे प्रकाशन रारावीकर यांच्या हस्ते करण्यात आले. लेखिका वीणा रारावीकर आणि प्रतिष्ठानाचे अध्यक्ष डॉ. अरविंद नेरकर या वेळी उपस्थित होते.

### अनुभूति चित्रप्रदर्शन रविवारपर्यंत खुले

**निसर्गसौंदर्य, लोककला,** आदिवासी चित्रकला, भारतीय संस्कृती, भारतीय इतिहास यासोबतच पौराणिक कथा, वारली पेंटिंग पाहण्याची संधी रसिकांना 'अनुभूति- मेनी व्हीजन, वन कॅनव्हास' या समूह चित्रप्रदर्शनानिमित्त उपलब्ध झाली आहे. घोले रस्त्यावरील राजा रविवर्मा कलादालन येथे रविवारपर्यंत (४ ऑगस्ट) दररोज हे प्रदर्शन पाहता येणार आहे.

# मृत जनावरांच्या दहनात पिंपरीत गैरव्यवहार

## 'दिल्लीवाला अँड सन्स' काळ्या यादीत, गुन्हा दाखल करणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत शहरातील मृत जनावरे उचलणे, त्याची विल्हेवाट लावण्याचे काम दिल्लीवाला अँड सन्स या संस्थेमार्फत केले जात होते. कामाच्या पावत्यांमध्ये फेरफार करीत एक लाख २२ हजारांचा आर्थिक अपहार केल्याने संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात आले. तसेच संस्थाचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

मृत जनावरे लोकवस्तीपासून दूर असलेल्या मोकळ्या जागेत दफन केली जातात. एमआयडीसी, भोसरीतील गवळीमाथा येथील जे ब्लॉक या ठिकाणी जनावरांचे दफन करण्यात येत होते. दरम्यानच्या काळात जनावरे दफन करण्यात येणारी जागा एमआयडीसीकडे हस्तांतरीत करण्यात आली. त्यानंतर पुणे महापालिकेच्या मान्यतेने नायडू पॉण्ड येथील दहन मशिनवर शहरातील जनावरांचे दहन करण्यास सुरुवात झाली. मोठ्या मृत जनावरासाठी प्रत्येकी तीन हजार रुपये शुल्क दिले जात होते. ती रक्कम दिल्लीवाला अँड सन्समार्फत पुणे महापालिकेला दिली जात होती. दहन शुल्काच्या पावत्या पशुवैद्यकीय विभागाला सादर करण्यात येत होत्या.

यासंदर्भात अॅड. मनीष कांबळे यांनी महापालिकेकडे तक्रार केली. त्यानुसार दहन शुल्काच्या पावत्या तपासल्या. पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्राप्त अहवालानुसार पावत्यांमध्ये दिल्लीवाला अँड सन्सने परस्पर फेरफार केल्याचे आढळून आले. संस्थेने सादर केलेल्या पावत्यांमध्ये आणि पुणे महापालिकेच्या दहन शुल्काच्या पावत्यांमध्ये एक लाख २२ हजारांचा फरक असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर आयुक्त शेखर सिंह यांच्या मान्यतेनंतर दिल्लीवाला अँड सन्स या संस्थेला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तसेच या संस्थाचालकावर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

> दिल्लीवाला अँड सन्स या संस्थेला तीन वेळा नोटीस दिली. संस्थेने समाधानकारक खुलासा केला नाही. त्यामुळे या संस्थेचे कामकाज थांबवून काळ्या यादीत नाव समाविष्ट केले आहे.
> – संदीप खोत, उपायुक्त, पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

## विवाहाच्या आमिषाने तरुणीवर बलात्कार

**पुणे :** विवाहाच्या आमिषाने तरुणीवर बलात्कार करणाऱ्या एकाविरुद्ध सिंहगड रस्ता पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

प्रसाद रमेश पोकळे असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत एका २२ वर्षीय तरुणीने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पीडित तरुणी आणि आरोपी प्रसाद यांची समाज माध्यमात ओळख झाली होती. प्रसादने तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर त्याने पीडित तरुणीला मोटारीत फिरायला नेण्याच्या बहाण्याने तिच्यावर बलात्कार केला.

आरोपीने मित्राच्या घरी नेऊन तिच्यावर बलात्कार केला. तरुणीने विवाहाबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने टाळाटाळ केली. विवाहास नकार देऊन त्याने फसवणूक केली, असे तरुणीने फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलीस निरीक्षक भोसले तपास करत आहेत.





गेल्या काही दिवसांपासून सातत्याने होत असलेल्या पावसामुळे सोलापूर रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. पूलगेट बसथांब्यापासून सोलापूरकडे जाणारा रस्ता आणि पूलगेटकडून गोळीबार मैदान चौकाकडे येणाऱ्या रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी, चिखल-गाळ ओसंडून वाहत आहे. खड्डे चुकवून वाहन चालविण्याची कसरत करताना चालकांची त्रेधातिरपीट उडत आहे. (छायाचित्रे : अरुल होरायझन)

# मोशीत राज्यघटना भवन

## दोनशे कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पिंपरी : महापालिकेच्या वतीने मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे राज्यघटना (संविधान) भवन आणि विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी दोनशे कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. या खर्चाला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली.

राज्यघटना भवन आणि विपश्यना केंद्र उभारणीसाठी मोशी-बोऱ्हाडेवाडी येथील २.५९ हेक्टर खुली जागा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे हस्तांतरित केली आहे. भारतीय राज्यघटना आणि जगभरातील लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करता यावा. तसेच, राज्यघटनेबाबत जनजागृती व्हावी. या उद्देशाने हे भवन उभारले जाणार आहे. भवनाच्या उभारणीसाठी महापालिका प्रशासनाने सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानंतर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. मंगळवारी (३० जुलै) झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत राज्यघटना भवन आणि विपश्यना केंद्र उभारण्यासाठी दोनशे कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच या कामासाठी २०२४-२५ या अंदाजपत्रकात पाच लाखांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यघटना भवन व विपश्यना केंद्राबाबतची नागरिकांची प्रतीक्षा संपली आहे.

### प्रश्न मार्गी

शहरात राज्यघटना भवन उभारण्याच्या हालचाली २०१८ मध्ये सुरू झाल्या होत्या. तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये भवनासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानंतर प्राधिकरणाचे पीएमआरडीएमध्ये विलीनीकरण झाले. त्यामुळे हा प्रकल्प रखडला होता. भवनासाठी पीएमआरडीएने महापालिकेकडे जागा हस्तांतरित केली. त्यानंतर महापालिकेने दोनशे कोटी रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता दिली.

> जगभरातील लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करण्यासाठी आणि भारतीय राज्यघटनेचा प्रचार-प्रसार अन् जागृती करण्यासाठी भारतातील पहिले राज्यघटना भवन पिंपरी-चिंचवडमध्ये साकारत आहे, ही निश्चित शहरवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे.
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी

# चाकणमधील वाहतूक कोंडीविरोधात स्थानिक ग्रामस्थ आक्रमक

## औद्योगिक वसाहत बंद करण्याचा इशारा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** तळेगाव-चाकण-शिक्रापूर व पुणे-नाशिक रस्त्यावरील चाकणमधील वाहतूककोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. आता या वाहतूक कोंडीविरोधात स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. वाहतूककोंडी सोडवण्यासाठी ९ ऑगस्टपर्यंत प्रशासनाला मुदत दिली आहे. त्यानंतर चाकण औद्योगिक वसाहत बंद करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे. चाकण परिसर हा अत्यंत वेगाने विकसित होणारा औद्योगिक परिसर आहे. रहिवासी भागही वाढत आहे. कामगार वर्ग, उद्योजक, साहित्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असलेले अत्यंत वर्दळीचे ठिकाण आहे. चाकणमधील तळेगाव चौक, आंबेठाण चौकातील वाहतूककोंडी मोठी समस्या बनलेली आहे. वाहनाच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. चाकणमधून बाहेर पडण्यासाठी अर्ध्या तासाहून अधिक वेळ लागतो. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील कामगार वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचू शकत नाहीत. याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.

> कुटुंबातील, जवळच्या व्यक्ती याच रस्त्याच्या समस्येमुळे आम्हाला सोडून गेल्या आहेत. काही कुटुंबातील कर्ते माणूस गेल्याने कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. त्यांच्या वेदना आणि यातना या प्रशासनाला काय समजणार? त्यासाठी आता नागरिक म्हणून आम्हालाच कृती करण्याची वेळ आली आहे. वाहतूककोंडी सोडवण्यासाठी चाकण मार्केट यार्ड ते आळंदी फाट्यादरम्यान एक किलोमीटर उड्डाणपूल उभारावा. त्यामुळे शिक्रापुरावरून येणारी वाहतूक पुलावरून जाऊन कोंडी कमी होईल. – राजेंद्र शिंदे, स्थानिक

> अवजड वाहने, कामगार, स्थानिकांची वाहने, तसेच अवैध वाहतुकीमुळे चाकणमधील वाहतूककोंडीचा प्रश्न जटिल बनला आहे. चाकणमधून बाहेर पडण्यासाठी अर्धा ते पाऊण तास लागतो. यामध्ये रुग्णवाहिका अडकतात. उद्योग बाहेर जाण्याची भीती वाटते. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने पुढाकार घेतला पाहिजे. उन्नत मार्ग होणार असल्याचे सांगितले जाते. परंतु, प्रत्यक्षात कार्यवाही होत नाही.
> – नितीन गोरे, स्थानिक

स्थानिक नागरिकही वाहतूककोंडीने त्रस्त आहेत. त्यामुळे वाहतूककोंडी सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिक, उद्योजकांकडून केली जात आहे. परंतु, वाहतूककोंडी सुटत नाही. वाहतूककोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत चालला आहे.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर व पुणे-नाशिक रस्त्याच्या दुरवस्थेबद्दल आणि वाहतूककोंडीबाबत चाकणमधील स्थानिकांची २८ जुलै रोजी बैठक पार पडली. रस्त्याची दुरवस्था, प्रलंबित असलेले काम पूर्ण होण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत चर्चा केली. वाहतूककोंडी सुटण्यासाठी काय केले पाहिजे, कुठे पाठपुरावा करावा, सरकारला धारेवर धरल्यावर रस्त्याचे काम होईल का, याबद्दल नागरिकांनी सूचना मांडल्या. वाहतूककोंडीबाबत अनेक वेळा प्रशासनाला निवेदन दिले. त्यावर शासन, प्रशासनाकडून केवळ आश्वासन दिले जाते. त्यामुळे स्थानिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

# पिंपरीतील विद्यार्थ्यांना दीड महिन्यानंतर शालेय साहित्य

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** शाळा सुरू होऊन दीड महिना झाल्यानंतर महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपास सुरुवात झाली आहे. शालेय साहित्याचे थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने वितरण करण्यासाठी 'ई-रुपी' कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. येत्या दहा दिवसांत सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण पूर्ण करण्यात येईल, असे शिक्षण विभागाने सांगितले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १०५ प्राथमिक आणि १८ माध्यमिक शाळा असून यामध्ये ४८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळा सुरू होऊनही शालेय साहित्य मिळाले नसल्याने पालकांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. अखेर शालेय साहित्य वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. महापलिकेच्या वतीने विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाणाऱ्या शालेय साहित्याच्या दर्जाच्या बाबतीत तक्रारी येत होत्या. त्यामुळे शालेय साहित्याची रक्कम थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने पालकांच्या खात्यावर वितरित केली जात होती. त्यातही त्रुटी आढळून आल्याने शैक्षणिक शालेय साहित्याचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांचा परिपूर्ण लाभ मिळावा. या प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण व्हावी यासाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धती अंतर्गत ई-रुपी या नवीन कार्यपद्धतीचा अवलंब केला.

> महापालिकेच्या शाळांमधील ४८ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यास सुरुवात झाली आहे. पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३७०० आणि पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३९०० रुपये क्यूआर कोडच्या माध्यमातून वितरीत करण्यात येत आहेत.
> – प्रदीप जांभळे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

### कशी आहे ई-रुपी प्रणाली?

थेट लाभ हस्तांतरण 'ई-रुपी' पद्धती अंतर्गत शालेय साहित्याच्या वितरणासाठी पालकांद्वारे विद्यार्थ्यांच्या संबंधित शाळेमध्ये अद्ययावत मोबाइल क्रमांकाची नोंदणी करण्यात आली आहे. बँकेमार्फत या मोबाइल क्रमांकावर क्यूआर कोड संबंधित लिंक असलेला संदेश पाठविण्यात येतो. या लिंकद्वारे मोबाइलमध्ये क्यूआर कोड तयार करण्यात येतो. शालेय साहित्य पुरवठादाराकडून क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर पालकांच्या मोबाइल क्रमांकवर ओटीपी जातो. हा ओटीपी पालकांनी पुरवठादारास सादर केल्यानंतरच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मिळते.

# राजीव साने : एक सर्जनशील विचारक

**प्रा. संतोष शेलार**



डॉ. रा. चिं. ढेरे संस्कृती संशोधन केंद्र आणि राजहंस प्रकाशन यांच्या सहयोगाने देण्यात येणारा श्रीगमा पुरस्कार ज्येष्ठ वैचारिक लेखक राजीव साने यांना गुरुवारी (१ ऑगस्ट) देण्यात येणार आहे. त्या निमित्ताने त्यांच्या लेखनकर्तृत्वाचा परिचय करून देणारा हा लेख.

**मध्यमवर्गीय कुटुंबात** राजीव साने यांचा जन्म झाला. वडील वाय. एस. साने सिव्हिल इंजिनीअरिंग विषयाचे अभ्यासू प्राध्यापक. त्यांच्यामुळे राजीव साने यांना थोर लोकांना ऐकण्याची संधी बालपणापासूनच मिळत गेली. या अर्थाने त्यांच्याकडे कुटुंबाकडून लाभलेली 'शिदोरी' समृद्ध होती. विविध विषयांत रस घेणं, चर्चा करणं, चिकित्सा करणं, एखाद्या गोष्टीचा उलगडा होईपर्यंत पिच्छा न सोडणं ही त्यांची वैशिष्ट्यं. विद्यार्थिदशेत अभियांत्रिकीचं शिक्षण घेताना 'कॅफे डिलाईट' नि 'हॉटेल रुपाली' या विद्यापीठात शाब्दिक कोट्या न् अफाट चर्चा यांची नशाही अनुभवली. आपली संगीत-साधनाही सुरू ठेवली. नंतरच्या काळात त्यांनी टेल्कोमध्ये नोकरी केली. कामगार चळवळीतही सक्रिय भाग घेतला. ते नवमार्क्सवादी (फ्रँकफर्ट स्कूल) असले, तरी गांधीवादाशीपण संवाद होता. संज्ञा-संकल्पना यांच्या काटेकोर व्याख्या करणं, अर्थांचे घोटाळे पकडणं, ते सोडवणं, समोरच्याला विचार करायला प्रवृत्त करणं हे त्यांचे उद्योग सुरुच होते. या काळात लिहिलेल्या 'थर्ड शिफ्ट', 'मर्म जिज्ञासा' या सदरांतून याचा प्रत्यय येतो.

मे. पुं. रेगे, श्रीनिवास दीक्षित या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांशी त्यांचा संपर्क आला. तर, यशवंतराव मराठे यांच्याकडून ते न्याय-वैशेषिक शिकले. एखादा ग्रंथ बारकाईने वाचून काढावा, असा प्रकार ते करत नाहीत. त्यांना तपशिलात नाही, तर तत्त्वात रस असतो. म्हणून एखाद्या ग्रंथाचं सार कशात आहे ते एखाद्या तज्ज्ञांकडून समजावून घेत तेवढीच सारभूत पानं वाचतात, ज्यातून त्यांना काही अंतर्दृष्टी प्राप्त होईल. त्या मर्मदृष्टी पचवून स्वतःच्या भावविश्वातील विचारव्यूह अधिकाधिक विकसित जाईल, त्या दिशेनेच ते वाचन-चिंतन करतात.

या प्रवासात त्यांच्या विचारधारेत प्रचंड बदल झाले. इतरही विचारधारांचा अभ्यास, चिंतन आणि कामगार चळवळीतील प्रत्यक्ष अनुभव यातून त्यांना नवमार्क्सवादाचाही अपुरेपणा जाणवू लागला. या काळात जागतिकीकरणाचे वारे जोराने वाहत होते. नरसिंह राव सरकारने सुरू केलेल्या आर्थिक सुधारणा देशाला खड्ड्यात नेणार, याविषयी पुरोगामी (मुख्यतः डावे) विचारवंत आणि संघवाले यांचे आश्चर्यकारक एकमत होते. या विरोधात जाऊन आर्थिक सुधारणांचं ठाम समर्थन करणाऱ्या अपवादात्मक विचारवंतांमध्ये राजीव साने अग्रक्रमाने होते. या कृतीमुळे त्यांना केवळ शिव्याच खाव्या लागल्या नाहीत, तर जमाव अंगावर येण्याचेपण प्रसंग घडले. राजीव दीक्षित यांच्या 'स्वदेशी'चं त्यांनी खंडन केले. हा लेख त्या काळी खूप गाजला. या बदलत्या परिस्थितीत एका नव्या राजकीय-आर्थिक विचारव्यूहाची गरज होती. ती साने यांच्या 'युगांतर' या ग्रंथानं भागवली.

आपल्याकडे बुद्धिवाद (रॅशनॅलिझम) विचारधारा ही प्रत्यक्ष प्रमाणवादी (अँग्लोसॅक्सन) परंपरेतून आली आहे. साने यांच्या मते, जे खरेखुरे दार्शनिक प्रश्न असतात, ते टाळले जातात. त्यातून जीवनदृष्टी मिळत नाही. ज्यातून जीवनदृष्टी मिळत नाही, त्याला तत्त्वज्ञान म्हणायचे कशासाठी, असा सवाल ते करतात. म्हणून खऱ्याखुऱ्या दार्शनिक प्रश्नांना भिडणारी 'कॉन्टिनेन्टल' परंपरा त्यांना जवळची वाटते. आधुनिकोत्तर काळात उद्भवलेल्या 'उच्छेदवादी' विचारधारांचे त्यांनी खंडन केले आहे.


रॅशनॅलिस्ट असले, तरी अध्यात्म विषयाचे त्यांना वावडे नाही. त्यांनी 'ईहवादी आत्मविद्या' विकसित केली आहे. धर्माबाबत आपल्याकडे दोन प्रमुख धारा आहेत. एक धारा कट्टर धर्मनिष्ठ असून, तिला धर्मातील दोष दिसतच नाहीत. दुसरी पुरोगामी विचारधारा. त्यात धर्म ही टाकाऊच गोष्ट असेल, तर तिचा विचार तरी कशाला करा, असे मानणारी आहे. धर्मचिकित्सकांनी धर्माचे दोष दाखवताना 'जन्माधारित विषमता' या मुद्द्यावरच भर दिला आहे. मात्र, साने यांनी हिंदू मानसिकतेतील दोष उघड केले. उदाहरणार्थ, युगकल्पना, कर्मविपाक, तपश्चर्यावाद, राजसी कर्त्याचा निषेध इत्यादी. तसेच हिंदूधर्माची जी बलस्थानं आहेत (उदा. एक धर्मग्रंथ नसणं), त्यांचा फायदा घेऊन धर्मसुधारणा कशी करता येईल, हेही दाखवून दिले. हिंदू धर्माला दार्शनिक अंग आहेत हे लक्षात घेत दार्शनिक आखाड्यात उतरून आपली नवी भूमिका मांडतात. त्यांचं 'नवपार्थहृद्गत : एक आधुनिकतावादी गीताचिंतन' या भूमिकेचे परिपक्व फळ आहे.

नीतिशास्त्र या विषयावर मराठीत अत्यल्प लेखन आहे. साने यांनी 'स्फूर्तिवादी नीतिशास्त्र' या ग्रंथातून नवी पायवाट सिद्ध केली आहे. दुष्कृत्यांच्या रोधनाबरोबरच अधिक प्रसाद-विकल्प खुले कसे करता येतील, याचा शोध प्रकर्षाने त्यांनी घेतला आहे. साने यांनी मराठी भाषेच्या विकासातही मोलाचं योगदान दिलं आहे. कोणताही तत्त्वज्ञ जेव्हा नवा विचारव्यूह रचतो तेव्हा त्याच्यासमोर भाषेची अडचण उभी राहते. त्याला ज्या नव्या संज्ञा, संकल्पना, रचना मांडायच्या असतात, त्यासाठी प्रचलित भाषेत पुरेसे शब्द नसतात. साने यांनी कित्येक नवे शब्द घडवून यावर मात केली आहे.

## वासुदेव दीक्षित यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खडकी येथील गुणवत्ता प्रमाणक विभाग येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी वासुदेव चिंतामण दीक्षित (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, मुलगी, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टचे विश्वस्त डॉ. पराग काळकर हे त्यांचे जामात होत.

## दैनंदिनी

- **पुस्तक प्रदर्शन** : अक्षरधारा बुक गॅलरी, राजहंस प्रकाशन, पुस्तकांचा मान्सून सेल, स्थळ - आचार्य अत्रे सभागृह, बाजीराव रस्ता, सकाळी १० ते रात्री ८.३०
- **पुरस्कार प्रदान** : फुले - शाहू-आंबेडकर विचारमंच, ज्ञानेश्वर मोळक यांना साहित्यसम्राट पुरस्कार, हस्ते - डॉ. श्रीपाल सबनीस, प्रमुख उपस्थिती - परशुराम वाडेकर, लता राजगुरू, अध्यक्ष - अॅड. प्रमोद आडकर, स्थळ - पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, सकाळी १०.३०
- **सांगीतिक कार्यक्रम** : सूर दरबार संस्था, मोहम्मद रफी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त सांगीतिक कार्यक्रम, 'फरिश्ता', गायक - संजय पोतनीस, अर्चना पोतनीस, रश्मी बडे, मृदुल निबते, सुषमा झोरे, ओंकार केळकर, सूत्रसंचालन - डॉ. भाग्यश्री कश्यप, स्थळ - पत्रकार भवन, गांजवे चौक, नवी पेठ, सायं.५.३०
- **चित्रप्रदर्शन** : 'अनुभूती - मेनी व्हिजन, वन कॅनव्हास', नरेंद्र गंगाखेडकर, दिलीप पुराणिक, विनय जोशी, वैभव कुटे, कृष्णा भुसारे, सुनील पवळे यांचे चित्रप्रदर्शन, उद्घाटन, हस्ते - दिलीप कोटीभास्कर, प्रमुख उपस्थिती - संतोष पांचाळ, स्थळ - राजा रवि वर्मा कलादालन, घोले रस्ता, शिवाजीनगर, सायं. ५.३०
- **प्रवचन** : श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ, चातुर्मास प्रवचन महोत्सव, विषय - ज्ञानोबा तुकोबांचे पंढरी महात्म्य, निरुपणकार - डॉ. पंकज तथा चेतनानंदजी महाराज, स्थळ - श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट, सायं. ६




PARIS 2024

# पॅरिस ऑलिम्पिक

## होरिगोमचे दुसरे ऑलिम्पिक सुवर्ण

जपानच्या युतो होरिगोमने पुरुषांच्या स्ट्रीट स्केटबोर्डिंग प्रकारात सुवर्णकामगिरी केली. टोक्यो ऑलिम्पिकमध्ये पदार्पण झालेल्या या खेळात होरिगोमने आपली सातत्यपूर्ण कामगिरी यावेळी सुरुच ठेवली. होरिगोम ९७.०८ गुणांसह आपले सुवर्णपदक निश्चित केले. होरिगोमने अमेरिकेच्या जॅगर एटन व नायजाह हुस्टन यांना मागे टाकले.



# मनूचे ऐतिहासिक दुसरे कांस्यपदक

## सरबज्योतसह १० मीटर एअर पिस्तूल प्रकारातील मिश्र सांघिक गटात यश

**पीटीआय, चॅटॅरॉक्स (फ्रान्स)**



**शांत आणि संयमी** मानसिकता राखत भारताच्या २२ वर्षीय मनू भाकरने मंगळवारी भारतीय क्रीडा इतिहासात नवा अध्याय जोडला. सरबज्योतच्या साथीने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारातील मिश्र सांघिक गटात कांस्यपदक मिळवताना मनूने एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके मिळविण्याची कामगिरी केली.

ऑलिम्पिकच्या इतिहासात स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत अशी कामगिरी करणारी मनू पहिलीच भारतीय खेळाडू ठरली. यापूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात १९०० मध्ये नॉर्मन पिचार्ड या धावपटूने २०० मीटर आणि २०० मीटर अडथळा शर्यतीत रौप्यपदकाची कमाई केली होती. भारताचा पहिला ऑलिम्पिक पदक विजेता म्हणून त्याचेच नाव घेतले जाते. दोन दिवसांपूर्वी वैयक्तिक कांस्यपदक मिळविल्यानंतर मनू मंगळवारी मिश्र सांघिक गटात सरबज्योतच्या साथीत तेवढ्याच आत्मविश्वासाने उभी राहिली. मनू-सरबज्योतने कोरियाच्या ली वोनोहो आणि ओह ये जिन जोडीचा १६-१० असा पराभव केला.

देशातील महिला खेळाडू आणि नेमबाजांसाठी ही एक मोठी उपलब्धी असताना सरबज्योतसाठी देखील हे पदक खास ठरले. कुमार गटापासून चमक दाखवणाऱ्या सरबज्योतने ऑलिम्पिकच्या पदार्पणात शनिवारी वैयक्तिक पदकासाठी प्रयत्नांची शिकस्त केली होती. मात्र, त्याला ५७७ गुणांसह नवव्या स्थानावर राहावे लागले होते. एका दिवसाच्या अंतराने दुसरे कांस्यपदक मिळविल्यावर मनूचा चेहरा अधिक उजळून निघाला होता. तिला आपला आनंद लपवता येत नव्हता. ''एकाच स्पर्धेत भारतासाठी दोन पदके मिळवू शकले याचा मला अभिमान वाटतो. मला प्रोत्साहन दिल्याबद्दल आणि पाठिंबा दिल्याबद्दल सदैव सर्वांची ऋणी राहीन,'' असे मनूने सांगितले. ''प्रतिस्पर्ध्यांचे नियोजन काय असेल, ते कसे खेळतील याची काहीच कल्पना नसते. आपल्या हातात असते तेवढे सर्वोत्तम प्रयत्न आपण करायचे असतात. शेवटपर्यंत लढण्याचा निर्धार होता व अखेरपर्यंत लढत दिली. त्याचे फळ मला मिळाले,'' असेही मनू म्हणाली.

भारताची सुरुवात खराब झाली होती. सरबज्योतला सुरुवातीला ८.६ गुणांचाच वेध घेता आला. मनूने मात्र १०.२ गुणांचा वेध घेतला. कोरियन जोडीने मात्र २०.५ गुणांसह फेरी जिंकून आघाडी घेतली. मिश्र दुहेरीत सर्वात प्रथम १६ गुणांची कमाई करणारी जोडी विजयी ठरते. पहिल्या फेरीतील अपयशाने जणू मनू प्रेरित झाली आणि कमालीच्या अचूकतेने लक्ष्य भेद करताना कोरियन जोडीवरील दडपण वाढवले. या वेळी सरबज्योतची देखील सुरेख साथ मिळाली. भारताने ८-२ अशी आघाडी घेतली आणि कधीच मागे वळून बघितले नाही. मनूच्या अचूकतेमुळे भारतीय जोडीला सर्वात आधी १६ गुणांची कमाई करता आली.

> प्रत्येक गोष्टीवर आपण नियंत्रण राखू शकत नाही. त्यामुळे केवळ सर्वोत्तम खेळ करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक शॉट्समध्ये आमची सर्वोत्तम ताकद दिली. खूप आनंदी आहे. – मनू भाकर

> वैयक्तिक प्रकारात अपयश आल्याने कमालीचा निराश होतो. लढतीसाठी उतरलो तेव्हा खूप दडपण होते. मनूच्या आत्मविश्वासाने धीर आला. एका ऑलिम्पिक पदकाचा आणि त्याचवेळी दुसऱ्या ऐतिहासिक पदकात योगदान देऊ शकलो याचा अभिमान वाटतो.
> – सरबज्योत सिंग



### राणांच्या मार्गदर्शनाखाली मनूचा आत्मविश्वास दुणावला - राम किशन

पिस्तूल नेमबाज मनू भाकरने पुन्हा एकदा पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली. पॅरिसमध्ये आपल्या मुलीच्या कामगिरीचे कौतुक करण्यासाठी शब्द नाहीत, असे मनूचे वडील राम किशन म्हणाले. ''माझ्याकडे शब्द नाहीत. जसपाल राणा हे आपल्या काळातील नामांकित नेमबाज होते. ते पुन्हा मनूसोबत आले तेव्हा तिचा आत्मविश्वास दुणावला. मनूचे प्रयत्न व जसपाल यांच्या मार्गदर्शनामुळेच यश मिळाले आहे,'' असे मनूच्या वडिलांनी सांगितले.

> नेमबाजीच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकाराच्या मिश्र सांघिक गटाच्या स्पर्धेत भारतासाठी कांस्यपदक मिळवून देणाऱ्या मनू भाकर आणि सरबज्योत सिंगचे अभिनंदन. मनूने एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदक जिंकणारी भारताची पहिली नेमबाज बनली. मी तिला व सरबज्योतला भविष्यातील कामगिरीसाठी शुभेच्छा देते.
> – द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

> नेमबाजांनी आपली चमकदार कामगिरी सुरूच ठेवली आहे. १० मीटर एअर पिस्तूल प्रकाराच्या मिश्र सांघिक गटाच्या स्पर्धेत भारतासाठी कांस्यपदकाची कमाई करून देणाऱ्या मनू भाकर आणि सरबज्योत सिंगचे मनापासून अभिनंदन. मनूचे हे दुसरे ऑलिम्पिक पदक आहे. यावरून तिच्या कामगिरीतील सातत्य व समर्पण दिसून येते.
> –नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> मनू व सरबज्योत तुम्ही जी कामगिरी केली, ती यापूर्वी कोणत्याही भारतीय नेमबाजी जोडीने केली नाही. भारताचे ऑलिम्पिकमधील नेमबाजीतील पहिले सांघिक पदक. या क्षणाचा मनापासून आनंद घ्या. आम्हाला तुमचा अभिमान आहे. – अभिनव बिंद्रा,
> ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नेमबाज

## भारतीय हॉकी संघ गटात अव्वल



**पॅरिस :** भारतीय हॉकी संघाने ऑलिम्पिक पदकाचा रंग बदलण्याच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकले. साखळीतील तिसऱ्या सामन्यात भारताने मंगळवारी आयर्लंडचा २-० असा पराभव केला. बाद फेरी गाठण्यासाठी भारतासाठी पहिल्या तीन लढती महत्त्वाच्या होत्या. या तीन लढतीतून दोन विजय, एक बरोबरीसह अपराजित संघ आव्हानात्मक 'ब' गटातून ७ गुणांसह अव्वल स्थानावर कायम आहे.

भारताच्या या विजयातही कर्णधार हरमनप्रीतचाच वाटा होता. दोन्ही गोल हरमनने ६ मिनिटांच्या अंतराने नोंदवले. सामन्याच्या १३व्या मिनिटाला गुरजंत सिंगने मैदानाच्या मध्यातून सुरेख चाल रचली आणि मनदीपच्या साथीत आयर्लंडच्या गोलकक्षात सहज प्रवेश केला. पण, दोघांना रोखण्याच्या प्रयत्नांत आयर्लंडच्या खेळाडूंकडून चूक झाली आणि पंचांनी भारताला पेनल्टी स्ट्रोक बहाल केला. हरमनप्रीतने ही संध दवडली नाही. त्यानंतर १९व्या मिनिटाला भारताला लागोपाठ दोन पेनल्टी कॉर्नर मिळाले. या वेळी हरमनप्रीतने चूक केली नाही आणि भारताला आघाडीवर नेले.

## सात्त्विक-चिरागची विजयी मालिका कायम

**पॅरिस :** यापूर्वीच बाद फेरी निश्चित झालेल्या भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीने अखेरच्या साखळी सामन्यात इंडोनेशियन जोडीवर सहज मात करत गटात अव्वल स्थान पटकावले. सात्त्विक-चिरागने 'क' गटातील अखेरच्या लढतीत इंडोनेशियाच्या रियान अर्दियान्टो-फजर अल्फियान जोडीचा ३८ मिनिटांत २१-१३, २१-१३ असा पराभव केला.

## ऑलिम्पिकमध्ये आज भारत

### नेमबाजी

■ ५० मीटर रायफल थ्री पोझिशन (पुरुष पात्रता)
ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर व स्वप्निल कुसाळे
वेळ : दुपारी १२.३० वा.

■ ट्रॅप (महिला पात्रता)
श्रेयसी सिंह व राजेश्वरी कुमारी
वेळ : दुपारी १२.३० वा.

### बॅडमिंटन

■ महिला एकेरी साखळी सामना
पीव्ही सिंधू वि. क्रिस्टिन कुउबा
वेळ : दुपारी १२.५० वा.

■ पुरुष एकेरी साखळी सामना
लक्ष्य सेन वि. जोनाथन क्रिस्टी
वेळ : दुपारी १.४० वा.

एचएस प्रणॉय वि. डुक फाट ले
वेळ : रात्री ११ वा.

### टेबल टेनिस

■ महिला एकेरी (सर्वोत्तम ३२ फेरी)
श्रीजा अकुला वि. जियान जेंग
दुपारी २.२० वा.

### बॉक्सिंग

■ महिला ७५ किलो (सर्वोत्तम १६ फेरी)
लवलिना बोर्गोहेन वि. सुन्निवा हॉफस्टेड
दुपारी ३.५० वा

■ पुरुष ७१ किलो (उपउपांत्यपूर्व फेरी)
निशांत देव वि. जोस गेब्रियल रोड्रिग्ज टेनोरियो
मध्यरात्री १२.१८ वा.

### तिरंदाजी

■ महिला 'सर्वोत्तम ६४' फेरी
दीपिका कुमारी
दुपारी ३.५६ वा.

■ पुरुष 'सर्वोत्तम ६४' फेरी
तरुणदीप राय
रात्री ९.१५ वा.


केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

क्षेत्रीय कार्यालय II
स. नं. ४३६, ३ रा मजला, सुखवाणी बिझनेस हब, नाशिक फाटा मेट्रो स्टेशनजवळ, कासारवाडी, पुणे–४११०२६
मोबा. : ९४०६८८००४७, ८०५५८११८७६

**विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रीकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोरसमेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि त्यासह वाचण्याच्या सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रुल ८ (६) च्या अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई–ऑक्शन विक्री सूचना**

या ठिकाणी सर्वसाधारण जनतेस आणि कर्जदार व जामीनदार यांना विशेषकरुन सूचना देण्यात येते की पुढे नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/बोज्याअंतर्गत असून कॅनरा बँक संबंधित शाखेचे अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तेचा **रचनात्मक ताबा** घेतला आहे, या संदर्भात **कर्जदार** यांच्याकडून संबंधित शाखांना येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि आकार वसुल करण्याकरिता सदर मालमतांची विक्री **"जसे आहे, जेथे आहे"** आणि **"जसे आहे, जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. **स्थावर मालमत्ता, राखीव किंमत, बयाणा आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख यांचे पूर्ण तपशील खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | शाखेचे/कर्जदाराचे नाव आणि पत्ता | येणे रक्कम व ताब्याचा प्रकार | मालमत्तेचा तपशील आणि स्थळ | ई–ऑक्शनची तारीख | राखीव किंमत / बयाणा रक्कम आणि बयाणा भरण्याची अंतिम तारीख / माहित असलेला बोजा | शाखेचे नाव, फोन नं. आणि ई–मेल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **श्री. चंद्रकांत तानाजी शेटे, एस.एस. शॅम्पेन इंडिया लि.,** नारायणगांव, जि. पुणे–४१०५०४. **आणि श्री. सादीक फैझा चौधरी,** मु.पोस्ट मुक्ताई मंदिर, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे–४१०५०४. | रु. १०,४५,७०७.६७ (रु. दहा लाख पंचेचाळीस हजार सातशे सात आणि पैसे सदुसष्ट फक्त) दि. ३१/०१/२०२२ रोजी, त्यावरील दि. ३१/०१/२०२२ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | रहिवासी बिल्डींगचे समतुल्य गहाणखत, फ्लॅट नं. १६, बी विंग, ४ था मजला, क्षेत्रफळ ८९५ चौ.फू. आणि चटई क्षेत्रफळ ६२.१४ चौ.मी. 'संस्कार लक्ष्मी नंदनवन', गांव नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे. उप–निबंधक नारायणगांव यांच्या अखत्यारीत आणि नारायणगांव ग्रामपंचायत यांच्या हद्दीत. **चतु:सीमा : उत्तरेस :** फ्लॅट नं. सी–१३, **दक्षिणेस :** फ्लॅट नं. बी–१३, **पूर्वेस :** मोकळी जागा, **पश्चिमेस :** फ्लॅट नं. बी–१३ | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. १०,७५ लाख / बयाणा रक्कम : रु. १.१० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : नारायणगांव फोन : ०२१३२–२४२९७३ / ७७५५९२६५७५ ई–मेल : cb2569@canarabank.com |
| २ | **शाखा : रांजणगाव** **श्री. अनिल सुरेश ठोकळ,** मु. पो. काटोरे वाडी, कमरगांव, ता. अहमदनगर महाराष्ट्र–४१४००५ आणि **सौ. साधना अनिल ठोकळ,** मु. पो. काटोरे वाडी, कमरगांव, ता. अहमदनगर महाराष्ट्र–४१४००५ | रु. १२,११,३३०.५५ (रु. बारा लाख अकरा हजार तीनशे तीस आणि पैसे पंचावन्न फक्त) दि. १७/१२/२०२१ रोजी, त्यावरील दि. १७/१२/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | गट नं. १३११ चा सर्वसामाईक भाग,००एच. १०आर पैकी, एस एस प्लाझा बिल्डींग, २ रा मजला, फ्लॅट नं. ३१२, बांधकाम क्षेत्रफळ ५५० चौ. फू., गाव शिक्रापूर, ता. शिरुर, जिल्हा पुणे येथे, **चतु:सीमा : उत्तरेस :** फ्लॅट नं. ३११, **दक्षिणेस :** मोकळे, **पूर्वेस :** मोकळे, **पश्चिमेस :** सर्व्हिस रस्ता | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ८.२५ लाख / बयाणा रक्कम : रु. ०.९ लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| ३ | **शाखा : रांजणगाव** **श्री. सोमनाथ बाबा दळवी,** मु.पो. शिक्रापूर, ता. शिरूर, पुणे–४१२२०८. **श्री. प्रविण पांडुरंग कांबळे,** ४८३, भेडसगांव हरीजन वाडा, भेडसगांव, मु.पो. शाहुवाडी, कोल्हापूर–४१६१२४. | रु. ४,६४,२७२.९९ (रु. चार लाख चौसष्ट हजार दोनशे बहात्तर आणि पैसे नव्याण्णव फक्त) दि. ०४/०२/२०२२ रोजी, त्यावरील दि. ०४/०२/२०२२ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | गट नं. १३११ चा सर्वसामाईक भाग, क्षेत्रफळ ०० हे. १० आर पैकी, एस.एस. प्लाझा बिल्डींग, १ ला मजला, फ्लॅट नं. २०५, बांधकाम क्षेत्रफळ ५५० चौ.फू., गांव शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे येथे. **चतु:सीमा : उत्तरेस :** फ्लॅट नं. २०४, **दक्षिणेस :** फ्लॅट नं. २०६, **पूर्वेस :** मोकळे, **पश्चिमेस :** सर्व्हिस रस्ता | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. १३.७५ लाख / बयाणा रक्कम : रु. १.४० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| ४ | **शाखा : रांजणगाव** **सौ. प्राजक्ता स्वप्निल सत्कार,** द्वारा स्वप्निल सत्कार, फ्लॅट नं. ६०३, ६ वा मजला, बी विंग, ग्रीन सिटी, तर्डोबाची वाडी रोड, तालुका शिरूर, जि. पुणे–४१२२१०. | रु. ३६,३६,९५५.२६ (रु. छत्तीस लाख छत्तीस हजार नऊशे पंचावन्न आणि पैसे सव्वीस फक्त) दि. ०३/१२/२०२३ रोजी, त्यावरील दि. ०३/१२/२०२३ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | फ्लॅट नं. ६०३ चा सर्वसामाईक भाग, ६ वा मजला, बी विंग, ग्रीन सिटी स्कीम, सर्व्हे नं. ३१९ आणि ३२० भाग वर बांधण्यात आलेले, प्लॉट नं. ए, क्षेत्रफळ २५०० चौ.मी., तर्डोबाचीवाडी रोड येथे स्थित, शिरूर नगरपरिषद आणि उप'निबंधक शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे यांच्या हद्दीतील. **चतु:सीमा : उत्तरेस** : फ्लॅट नं. ६०२, डक्ट आणि लॉबी, **दक्षिणेस** : मोकळे आकाश, **पूर्वेस** : मोकळे आकाश, **पश्चिमेस** : लिफ्ट आणि जिना | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ३२.०० लाख / बयाणा रक्कम : रु. ३.२० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| ५ | **शाखा : कराड** **श्रीमती. श्रृती सूरज नांदे,** १२८, अशोक चौक, शिंदे गल्ली, शनिवार पेठ, कराड, जि. सातारा,–४१५११० **श्री. सूरज संपत नांदे,** १२८, अशोक चौक, शिंदे गल्ली, शनिवार पेठ, कराड, जि. सातारा,–४१५११० | रु. २६,२८,९४२.२३ (रु. सव्वीस लाख अठ्ठावीस हजार नऊशे बेचाळीस आणि पैसे तेवीस फक्त) दि. १५/०९/२०२३ रोजी, त्यावरील करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | फ्लॅट नं. १०१ चा सर्वसामाईक भाग, तळमजला, दर्शन रेसिडेन्सी, बिगरशेत जमीन, प्लॉट नं. ११ (क्षेत्रफळ १५०.१५ चौ.मी.), स.नं. ३४५/१ पैकी, गांव मुंढे, ता. कराड, जि. सातारा, क्षेत्रफळ ७९ चौ.मी. म्हणजेच ८५० चौ.फू. **सदर फ्लॅटच्या चतु:सीमा : उत्तरेस** : मोकळी जागा आणि प्लॉट नं. १०, **दक्षिणेस** : मोकळी जागा आणि प्लॉट नं. १२, **पूर्वेस** : मोकळी जागा आणि रस्ता, **पश्चिमेस** : सामाईक पॅसेज आणि जिना | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ७.५० लाख / बयाणा रक्कम : रु. ०.७५ लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : कराड फोन : ०२१६४ – २२२२६२/ ७७५५९२६६३९ ई–मेल : cb15410@canarabank.com |
| ६ | **शाखा : नारायणगांव** **श्री. जगन्नाथ कशाप्पा पांचाळ,** शिव विहार सोसायटी, सरकारी हॉस्पिटल जवळ, एल. नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे, महाराष्ट्र–४१०५०४. **सौ. संगीता जगन्नाथ पांचाळ,** मु.पोस्ट नारायणगांव शिवविहार सोसायटी, ता. जुन्नर, जि. पुणे, महाराष्ट्र–४१०५०४. | रु. १६,०७,५०७.०० (रु. सोळा लाख सात हजार पाचशे सात फक्त) दि. २८/०१/२०२२ रोजी, त्यावरील दि. २८/०१/२०२२ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | समतुल्य गहाणखत असलेल्या फ्लॅट नं. सी–२०१ चा सर्वसामाईक भाग, चटई क्षेत्रफळ ४७.७१ चौ.मी., २ रा मजला, 'स्वप्नशिल्प रेसिडेन्सी' बिल्डींग, विंग ए, एनए जमीनीचे क्षेत्रफळ २६५० चौ.मी., स.नं. ४८१/१/१ (जुना स.नं. ४५०/१), गांव नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे येथे स्थित आणि उप–निबंधक नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे यांच्या अखत्यारीत. **चतु:सीमा : उत्तरेस** : फ्लॅट नं. २०२, **दक्षिणेस** : फ्लॅट नं. २१०, **पूर्वेस** : पॅसेज आणि डक्ट (मोकळे आकाश), **पश्चिमेस** : रिकामी जागा (मोकळे आकाश). | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. १२.७० लाख / बयाणा रक्कम : रु. १.३० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : नारायणगांव फोन : ०२१३२–२४२९७३/ ७७५५९२६५७५ ई–मेल : cb2569@canarabank.com |
| ७ | **शाखा : रांजणगाव** **श्री. अरुण रावसाहेब म्हस्के,** फ्लॅट नं. ५०६, एस.एस प्लाझा, मु. पो, शिक्रापूर, तालुका शिरुर, जिल्हा पुणे महाराष्ट्र–४१२२०८. | रु. ११,०२,९२१.८९ (रु. अकरा लाख दोन हजार नऊशे एकवीस आणि पैसे एकोणनव्वद फक्त) दि. १७/०४/२०२३ रोजी, त्यावरील दि. १७/०४/२०२३ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | फ्लॅट नं. ५०६, एस. एस. प्लाझा, मु. पो, शिक्रापूर, तालुका शिरुर, जिल्हा पुणे महाराष्ट्र–४१२२०८, **चतु:सीमा– पूर्वेस** : मोकळे, **पश्चिमेस** : सर्व्हिस रस्ता, **उत्तरेस** : फ्लॅट नं. ५०५, **दक्षिणेस** : फ्लॅट नं. ५०७, | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ८.२५ लाख / बयाणा रक्कम : रु. ०.९ लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| ८ | **शाखा : रांजणगाव** **श्री. घोलप राजेंद्र नारायण** मु. पो. बोरी, बु., माळवाडी, बोरी बु., पुणे–४१२४११, **श्री. तानाजी महादेव घोलप,** ११२९ माळवाडी, मु. पो. बोरी बु. तालुका जुन्नर, पुणे–४१२४११ | रु. १२,९०,८७८.६२/– (रूपये बारा लाख नव्वद हजार आठशे अठ्ठ्याहत्तर आणि पैसे बासष्ट फक्त) दि. १७/१२/२०२१ रोजी, त्यावरील दि. १७/१२/२०२१ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग : गट नं. १३११, क्षेत्रफळ ००एच.१०आर पैकी, एस.एस प्लाझा बिल्डींग, ४ थ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५०४, बांधकाम क्षेत्रफळ ५५० चौ. फू., गाव शिक्रापूर, ता. शिरुर, जिल्हा पुणे, **चतु:सीमा : उत्तरेस :** फ्लॅट नं. ५०३, **दक्षिणेस :** फ्लॅट नं. ५०५, **पूर्वेस :** मोकळे, **पश्चिमेस :** सर्व्हिस रस्ता. | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ८.२५ लाख / बयाणा रक्कम : रु. ०.९ लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| ९ | **शाखा : रांजणगाव** **श्री. भाऊसाहेब सोपान पांढरकर (कर्जदार),** गट नं. १८४ एल ॲण्ड टी फाटा, डिलक्स बेअरींग लि. च्या पुढे, सणसवाडी, तालुका शिरुर, पुणे, महाराष्ट्र – ४१२२०८ **आणि श्री. महेंद्र साजनाथ महाडिक (जामीनदार),** मु. पो. शिक्रापूर, तालुका शिरुर, पुणे, महाराष्ट्र – ४१२२०८ | रु. १०,३७,५०२.०० (रु. दहा लाख सदतीस हजार पाचशे दोन फक्त) दि. ०३/०३/२०२२ रोजी, त्यावरील दि. ०३/०३/२०२२ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग; गट नं. १३११, ००एच १० आर पैकी, एस.एस. प्लाझा बिल्डींघ, दुसरा मजला, फ्लॅट नं. ३०१, क्षेत्रफळ ५५० चौ. फू. बांधकाम, गाव शिक्रापूर, तालुका शिरुर, जिल्हा पुणे येथे स्थित. **चतु:सीमा : उत्तरेस :** मोकळे, **दक्षिणेस :** फ्लॅट नं. ३०२, **पूर्वेस :** मोकळे, **पश्चिमेस :** सर्व्हिस रोड | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. १३.७५ लाख / बयाणा रक्कम : रु. १.४० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : रांजणगाव फोन : ०२१३८ – ०२४३२८१/ ७७५५९२६६१७ ई–मेल : cb3407@canarabank.com |
| १० | **शाखा : पिंपरी मेन** **सौ. रेश्मा नितीन घोरपडे आणि श्री. नितीन रामचंद्र घोरपडे, पत्ता :** २९/१४, निल–गंगा हौसिंग सोसायटी, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे – ४११०२६ | रु. ३१,३८,५४४/– (रु. एकतीस लाख अडतीस हजार पाचशे चव्वेचाळीस फक्त) दि. ३१/१०/२०२२ रोजी, त्यावरील दि. ३१/१०/२०२२ पासूनचे करारानुसार होणारे, सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याज, प्रासंगिक खर्च, इतर आकार व किंमत यांसहीत **ताब्याचा प्रकार : रचनात्मक ताबा** | फ्लॅट नं. ९०३ चे समतुल्य गहाणखत, क्षेत्रफळ सुमारे ५६.३८ चौ. मी., ९ वा मजला, बिल्डींग बी, म्हाडा एमजी सॅनेट २५४ स्कीम, जमीन स. नं. ३०९, गाव पिंपरी वाघेरे, तालुका हवेली, जिल्हा पुणे. पीसीएमसी यांच्या स्थानिक हद्दीत | ३१/०८/२०२४ | राखीव किंमत : रु. ४६.२५ लाख / बयाणा रक्कम : रु. ४.७० लाख दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० / बँकेला माहित नाही. | शाखा : पिंपरी मेन शाखा फोन : ०२०–२७४२०२०५ / ७७५५९२६६०८ ई–मेल : cb0418@canarabank.com |

**विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तीकरिता कृपया कॅनरा बँकची वेबसाईट म्हणजे (www.canarabank.com) यावर उपलब्ध करुन देण्यात आलेली "ई–ऑक्शन" लिंक पहावी. किंवा कॅनरा बँक, संबंधित शाखा येथे कामकाजाच्या वेळेत कुठल्याही कामकाजाच्या दिवशी संपर्क साधावा.**

दिनांक : २९/०७/२०२४, ३०/०७/२०२४
स्थळ : पुणे

अधिकृत अधिकारी,
कॅनरा बँक


हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव – द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी-** ६७२४१०००. **फॅक्स -** ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ निवासी संपादक : सिद्धार्थ केळकर*** (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.